# देवाची अद्भुत कृपा

विल्यम मॅक्डोनाल्ड

अनुवादक : शैलजा शर्मा आणि विक्रम जाधव

Authentic™

HYDERABAD

*Devachi Adhbuth Krupa*
(Marathi)

God's Amazing Grace
by William MacDonald

First Marathi edition 2014

ISBN: 978-93-83691-55-5

All rights reserved.
No part of this publication may be reproduced in any form or by any means, electronic, or mechanical, including photocopying, recording, or any information storage and retrieval system, without permission in writing from the publisher.

Published by
Authentic Books
Logos Bhavan, Suchitra Junction, Secunderabad 500 067, Telangana.
www.authenticindia.in

Authentic Books is an imprint of Authentic Media (India), the publishing division of OM Books Foundation.

Printed and bound in India by
Authentic Media, Secunderabad 500 067

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | अद्‌भुत कृपा | 9 |
| २) | एक अद्वितीय उपाय | 13 |
| ३) | आता शुभवर्तमान | 21 |
| ४) | परमेश्वराची विस्मयकारक कृपा | 25 |
| ५) | कृपेचे मोल कसे ओळखावे | 31 |
| ६) | सुवार्ता जी खोटी आहे | 49 |
| ७) | खरा विश्वासणारा ओळखणे सोपे आहे | 61 |
| ८) | आपले बोलणेच आपला विश्वासघात करते | 67 |
| ९) | कार्यातील उणीवा | 71 |
| १०) | या प्रश्नाचे उत्तर द्या | 73 |
| ११) | कृपेचा दुरुपयोग | 79 |
| १२) | देव पावित्र्य कसे निर्माण करतो | 83 |
| १३) | ही अवघी कृपाच | 91 |
| १४) | कृपेची उजळणी | 95 |


*(पाठातील काही वाक्ये, उतारे आणि ओळींच्या शेवटी वरच्या बाजूस बारीक अक्षरात आकडे दिले आहेत. हे आकडे त्या परिच्छेदाचा संदर्भ दर्शवितात. या संदर्भांची संपूर्ण सूची पुस्तकाच्या शेवटी वाचकांच्या उपयुक्ततेसाठी 'स्पष्टीकरणार्थ अंतिम टीपा' म्हणून दिली आहे.)*

# अद्‌भुत कृपा

अत्यंत त्रासदायक बालपण व तारुण्यानंतर न्यूटन त्याच्या वडीलांच्या भूमध्यसागरी व्यापारी जहाजावार कामास रुजू झाला. तेथे तो अनिति, दुर्व्यसने आणि व्यभिचार यामध्ये पूर्णपणे बुडून गेला. त्याच्या विषयी म्हणत की, तो शिव्या देणे व अपशब्द बोलण्यात एवढा तरबेज होता की, दोन तास अशा प्रकारचे दुर्भाषण करताना एकही शब्द तो पुन्हा वापरत नसे. याममुळे त्याच्या वडिलांनी त्याला कामावरुन काढून टाकले. त्यानंतर तो गुलामांच्या जहाजावर काम करू लागला आणि तेथे तो स्वतःच त्याच्या अफ्रिकन मालकाच्या पत्नीचा गुलाम झाला.

जेव्हा एका सागरी वदळात तो आता मरणारच होता त्या क्षणी तो देवाकडे वळला व वाचला. त्यानंतर ज्या शुभवर्तमानाला त्याने तुच्छ लेखले होते, ज्याचा तिरस्कार केला होता. त्याच साठी तो सेवक बनला.

त्याच्या तारणाचे वैयक्तिक अनुभव त्याच्या या अत्यंत आवडत्या गीतात जतन करुन ठेवलेले आहेत. या गीताच्या दूरदर्शी जिज्ञासूपणामुळे ते गीत खूपदा वाद्यवृंदांना आवडणाऱ्या गीतांच्या यादीत अगदी वरच्या क्रमांकावर असत आले आहे कारण कदाचित ते लोक परमेश्वराच्या या अत्यंत अद्‌भुत कृपेपासून अनाभिज्ञ होते.

## *Amazing Grace*
## अद्‌भुत कृपा

*अद्‌भुत कृपा, किती मधुर नाद*
*मज भ्रष्टा तारिले*
*हरवलेला मी, आता सापडलो*
*गेले अंधत्व, पाहतो.*
*कृपेनेच शिकवले या हृदयाला भय*
*कृपेनेच भय दूरही केले*
*मौल्यवान किती ती कृपाही भासली*
*विश्वासण्याच्या क्षणी हो मला*

*संकटे, परिश्रम, अमिषांमधून*
*मी आलो येथवरी*
*कृपेनेच आणिले, मज येथवरी*
*कृपाच नेईल घरी*

*तेथे असू आपण, हजारो वर्षे*
*प्रकाशत सूर्यासमान*
*गौरव देवाचे गातच राहू या*
*आरंभील्या क्षणापासून*

## प्रकरण १

# अद्भुत कृपा

देवासमोर एक समस्या आहे. खरं तर अगदी तसच नाही. महान परमेश्वरासमोर समस्या येण्यासाठी तो फारच शक्तिशाली व ज्ञानी आहे. तोच स्वतः त्या सोडवतो, पण आपल्याला असे वाटते की, मानवजातीतच्या तारणाची योजना आखण्यात त्याला समस्या आहे. जेव्हा आपण म्हणतो देवाला समस्या आहे, तेव्हा अशी भाषा आपण त्याकडे मानवी दृष्टीकोनातून पाहिल्यामुळे वापरत असतो.

आता आपल्याला ते उलगडले आहे तर मग समस्या काय आहे? देवाच्या दोन गुणविशेषांमुळे वरवर पाहता संघर्ष असल्यासारखे वाटते ते म्हणजे देवाची प्रीति आणि देवाची पवित्रता.

एकीकडे देव हा प्रीतिचा देव आहे. तो लोकांवर अपरिमित प्रिति करतो. मानव ही त्याची अत्युच्च प्रतिची निर्मिती आहे. त्याच्या इतर सर्व अद्भुत निर्मितीकडे पाहिल्यास मानवजातीमुळे त्याला सर्वात जास्त आनंद प्राप्त होतो. परमेश्वराला प्रत्येक स्त्री, पुरुष, मुलगा, मुलगी या सर्वांसह सार्वकालिक जीवनात सहभागिता व संगती हवी आहे.

पण समस्या अशी आहे की, आपण सर्व पापी आहोत आणि परमेश्वर पवित्र आहे. पाप त्याला कधीच मान्य होऊ शकत नाही. तो पापाकडे दुर्लक्ष करून त्या बद्दल सूट देऊ शकत नाही. पापासाठी शिक्षा ही झालीच पाहिजे आणि पापाचे वेतन मरण आहे. आता जर हे सर्व पापी लोक स्वर्गात असायला हवे असतील तर त्यांचे पाप काहीही करून

त्यांच्यापासून दूर व्हायला हवे. त्याचे वेतन भरायला हवे. देवासोबत राहण्यासाठी लोक स्वच्छ व शुध्द असायला हवेत.

तर हीच प्रचंड मोठी समस्या आहे. एका बाजूला देव प्रीतिमय आहे आणि त्याचे प्रेम कोणालाही नष्ट होऊ द्यायला तयार नाही. कोणाचाही सार्वकालिक नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही. प्रत्येकाने स्वर्गाचे वैभव व आनंद अनंतकाळासाठी उपभोगावा अशी त्याची इच्छा आहे.

पण देव प्रकाश आहे. त्याच्या प्रामाणिकपणानुसार प्रत्येक पातक्याच्या पापाबद्दल भरपाई तर झालीच पाहिजे. प्रत्येक दुष्ट विचार, शब्द व कृती यासाठी शिक्षेची भरपाई दिली जावी अशी त्याची इच्छा आहे. ज्याच्या पातकांची क्षमा झालेली नाही असा एकही पापी कदापि स्वर्गात जाऊ शकत नाही.

तर परमेश्वर ही तारणाची योजना कशी योजणार ज्यामुळे त्याच्या प्रेमाचे समाधान तर होईल, परंतु त्याच्या प्रामाणिकपणाशी त्याला तडजोड करावी लागणार नाही. एकाच वेळी तो न्यायी देव व तारणारा कसा होऊ शकेल? तो कसा काय प्रामाणिक परमेश्वर असूनही अपवित्र पातक्यांना क्षमा करणार? हाच पेचप्रसंग आहे.

प्रसिध्द ग्रीक तत्वज्ञ सॉक्रेटीस एकदा प्लॅटोला म्हणाला, (त्यावेळी प्लॅटो त्याचा विद्यार्थी होता.) 'देव पापांची क्षमा करू शकेल पण कशी ते मला माहिती नाही.'

तारणारच्या कोणत्याही योजनेकरिता आवश्यक असणाऱ्या सात बाबी –

पापात पडलेल्या मानवजातीची त्यातून सूटका करण्याचा परमेश्वराचा निर्णय म्हणजे अवर्णनीय कृपेची कृती होय. पण एकदा त्याने तो निर्णय घेतला तर त्याला त्याचे प्रेम व पावित्र्य याचे पूर्ण समाधान होईल अशा प्रकारे त्याची योजना करणे गरजेचे होते. त्याची सर्वांवर प्रीति आहे त्यामुळे त्याचे तारण सुध्दाः

- सर्वांसाठी असावे. एकही व्यक्ती त्यापासून वंचित राहू नये असे त्याला वाटते.
- सर्वांना पुरेसे असावे. काही ही अपवाद करावा न लागता त्याला सर्वांच्या गरजा पुरवता याव्यात.
- असे काही ज्यासाठी प्रत्येकजण पात्र असेल. त्यांत सहभागी होण्यापासून कोणालाही कोणत्याही दुष्टतेचा अडथळा होऊ नये.
- कोणालाही सहज समजेल असे ते असावे. जे अनाकलनीय आहे असे काही ही देऊ करण्यात काहीच अर्थ नाही.
- असे काही जे कोणालाही मिळू शकेल. खऱ्या धर्मात अशा कोणत्याच अटी नसाव्यात ज्या काहींना पूर्ण करता येणार नाहीत.
- मानवाला बढाई मारता येईल अशी कोणतीच शक्यता त्यात नसावी. गर्वातून व बढाईव्दारेच पाप निर्माण होते आणि स्वर्गात बढाई किंवा गर्व नसणार आहे. त्या गर्वाला दूर ठेवण्यासाठी सर्वांची स्वर्गात जाण्यासाठी समान पात्रता असायला हवी.
- तरीसुध्दा ही योजना कोणाच्याही इच्छेविरुध्द त्या व्यक्तिवर लादली जाऊ नये. सक्तीची असू नये.

## प्रकरण २

# एक अद्वितीय उपाय

हा दैवी पेचप्रसंग सोडवण्याचा, कल्पना करता येण्याजोगा एकच उपाय आहे. तो 'बदली' किंवा 'च्या ऐवजी' या शब्दांत सापडतो. सर्व लोकांच्या पापांची खंडणी भरण्यासाठी त्यांच्याऐवजी कोणीतरी अनुरुप असे असावे. 'बदली' किंवा 'च्या ऐवजी' खेळांमध्ये, प्रशिक्षक एका खेळाडूच्या ऐवजी दुसरा खेळाडू मैदानावर खेळायला पाठवतात. जुन्या कराराच्या काळातील सर्वसाधारण विश्वासणाऱ्यांना 'च्या ऐवजी' ह्याचा अर्थ समजत होता. जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या पापक्षालनासाठी वेदीसमोर एखादा प्राणी आणत असे तेव्हा ती त्या प्राण्याच्या डोक्यावर आपला हात ठेवत असे जेणेकडून त्या व्यक्तिची पापे त्या प्राण्यावर जात आणि त्या व्यक्तिच्या ऐवजी त्या प्राण्याचे बलिदान केले जाई.

होय, या दैवी पेचप्रसंगावरील उपाय हाच होता की, या पापी मानवजातीच्या ऐवजी अनुरुप अशा कोणाचे बलिदान व्हावे. तरी त्या 'बदली' असणाऱ्या बद्दल सुध्दा काही अटी होत्या.

त्या 'च्या ऐवजी' किंवा 'बदली' असणाऱ्याला पाच परिक्षांमधूमन जाणे आवश्यक होते.

- तो 'बदली' हा 'मनुष्य' असायला हवा. नाहीतर ती अदली-बदली योग्य व बरोबरीची होणार नाही.
- तो 'पापविरहीत' असायला हवा. नाहीतर त्याला त्याच्या स्वतःच्या पापांसाठीच मरावे लागेल.
- तो देव असावा. केवळ एक असीम व्यक्तिच अगणित लोकांच्या,

अगणित पातकांच्या बद्दल प्रायश्चित घेऊ शकते. या मानवजातीच्या भूत काळातील, वर्तमानकाळातील आणि भविष्यकाळातील अशा सर्व पातकांचा अंतर्भाव झाला तरी त्या सर्वांच्या ऐवजी असणारा 'तो' त्यापेक्षा खूप किमती, त्या योग्यतेचा असायला हवा.

- त्याने स्वतःचे रक्त सांडायला हवे. कारण दैवी कायद्याच्या फर्मानानुसार रक्त सांडल्याशिवाय पापांची क्षमा नाही. रक्तात 'जीवन' आहे. आणि जीवनासाठी जीवनाचेच बलिदान झाले पाहिजे.
- तो स्वखुशीने तयार असावा. अन्यथा सैतान देवावर दोषारोप करील की, देवाने अन्यायाने एका इच्छा नसलेल्याला अपवित्र पाप्यांकरीता मरणदंड सोसायला भाग पाडले.

## प्रभु येशू सर्वच बाबतीत पात्र आहे.

वरील सर्व अटी पूर्ण करील अशी एकच व्यक्ती या संपूर्ण विश्वात असून ती म्हणजे प्रभु येशू ख्रिस्त.

- बेथलेहेमात तो मानवरुपात आला. कुमारी मरियेच्या पोटी जन्मला. तो एक परिपूर्ण मानव आहे.[१] ख्रिस्ती गीते लिहीणारे महान कवी चार्लस् वेस्ले लिहीतात 'आपल्या प्रभुने कालावधी संकुचित करुन, अनाकलनीयपणे ते मानव झाला.'
- तो देव आहे.[२] त्याच्यात देवाची स्वभाववैशिष्ठ्ये आहेत. त्याला देवासमान पदव्या आहेत व येशू आणि पिता परमेश्वर हे एकसमान आहेत.
- तो (पापविरहीत) निष्पाप आहे. ज्या नोंदी केलेल्या आहेत त्या नाकारता येत नाहीत. त्याला पाप ठाऊक नव्हते, त्याने पाप केले नाही आणि त्याच्यामध्ये मुळीच पाप नव्हते.[३]
- कालवरी येथे त्याने वधस्तंभावर पापी लोकांच्या खंडणीसाठी स्वतःचे रक्त सांडले. देवाचा पुत्र येशू ख्रिस्त, ह्याचे रक्त जे सर्व पापे धुवून टाकते त्याचा अगणित लोकांनी फायदा घेतला.[४]
- पापी लोकांचे तारण व्हावे म्हणून स्वेच्छेने त्याने हे केले. तेथे

नाखुषी किंवा नाराजी नव्हती, काहीच राखून ठेवलेले नव्हते. उलट, परमेश्वराच्या इच्छेपुढे आनंदाने केलेले समर्पण होते.[५]

संपूर्ण पवित्रशास्त्रात ख्रिस्ताचे आपल्यासाठी 'बदली' म्हणून असणे हे सत्य दिसून येते. यशया निर्भयतापूर्वक जाहीर करतो की,

> ''खरोखर आमचे व्याधि त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले ... तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला, आम्हांस शांति देणारी अशी शिक्षा त्यास झाली, त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हांस आरोग्य प्राप्त झाले... आम्हा सर्वांचे पाप परमेश्वराने त्याजवर लादिले.''[६]

बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने म्हटले, ''हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा!''[७] प्रेषित पौल मोठ्या आश्चर्याने म्हणतो, 'तो देवाचा पुत्र... त्याने मजवर प्रिति केली व स्वतःला माझ्यासाठी अर्पिले,'[८] पेत्राने साक्ष देताना म्हटले, ''वधस्तंभावर त्याने आम्हा सर्वांची पातके स्वतःवर घेतली.''[९] आणि निग्रहाने प्रेमाची घोषणा करणारा प्रेषित राहून जाऊ नये. तो म्हणतो, "त्याने स्वतः आपल्यासाठी पापाऐवजी कृपा मिळवली आणि केवळ आपल्यासाठीच नव्हे तर पूर्ण जगासाठी त्याने ती मिळवली.[१०]

## परमेश्वराची तारणाची योजना सर्व बाबतीत परिपूर्ण आहे.

आता परमेश्वर त्याच्या कृपेच्या शुभवर्तमानाची आणि तारणाच्या आश्चर्यकारक मार्गाची घोषणा करू शकत होता कारण मानवजातीच्या ऐवजी बलिदानासाठी लागणाऱ्याच्या सर्व आवश्यक बाबींची पूर्तता प्रभु येशू ख्रिस्ताव्दारे उत्तम प्रकारे पूर्ण केली जाणार होती. जे स्वतःच्या पापांबद्दल पश्चाताप करून देवाचा पुत्र येशू ख्रिस्त याचा विश्वासाच्या निश्चितकृतिव्दारे स्वतःचा प्रभु व तारणारा म्हणून स्वीकार करतील त्यांना परमेश्वर तारणाची देणगी आता मोफत देऊ शकत होता.

- लक्षात घ्या, हे तारण सर्वांसाठी उपलब्ध आहे. शुभवर्तमान सांगते, ''जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.''[११] जर ते पैशावर अवलंबून असते तर गरिबांना त्याचा लाभ मिळाला नसता.
- ते सर्वांना पुरेल इतके आहे.[१२] या असीम तारणाऱ्याच्या मृत्युमध्ये अखिल जगाच्या पापाबद्दल खंडणी भरण्याची शक्ती होती. त्यामुळे ते तारण खूपच विपूल प्रमाणात उपलब्ध आहे.
- प्रत्येकाने पाप केले आहे म्हणून प्रत्येकजण यासाठी पात्र आहे.[१३] पाप्याची अयोग्यताच त्याला देवाने देऊ केलेल्या तारणासाठी पात्र बनवते. सार्वकालिक जीवनाची देणगी ही केवळ बुध्दिमान, श्रीमंत, देखण्या किंवा प्रसिध्द व्यक्तींसाठी मर्यादित नाही, नाहीतर आपण काहीजण त्यासाठी कधीच पात्र ठरलो नसतो. आणखी जर ती देणगी केवळ जे वाचू शकतात, चढू शकतात, बोलू किंवा बघू शकतात अशांसाठी असती तर आणखी काही जण त्यातून कमी झाले असते. केवळ शुभवर्तमान हेच संपूर्ण जगासाठी योग्य असे आहे.
- कोणालाही समजण्याइतके ते साधे-सोपे आहे. कोणीच इतके अनभिज्ञ किंवा अशिक्षित नाही. शुभवर्तमाननत प्रभु येशू ख्रिस्त म्हणत आहे 'या'[१४] यात काहीच कठीण नाही. विल्यम क्वूपर म्हणतात,

> ''बापरे! माणासांची कामे किती वेगळीच आणि गुंतागुंतीची असतात,
> स्वर्गाची योजना मात्र, साधी व सहज साध्य होणारी आहे.

- ते कोणालाही प्राप्त होऊ शकते.[१५] तारण पश्चात्तापाव्दारे मिळते म्हणून ते कोणीही प्राप्त करु शकते. ते विश्वासाव्दारे आहे, प्रभु येशू ख्रिस्तावर कोणीही विश्वास ठेवू शकतो. प्रभु येशू इतके कोणीही विश्वसनीय नाही आणि निर्मितीला म्हणजेच मानवाप्राण्यांना त्यांच्या निर्मात्यावर विश्वास ठेवण्याइतके रास्त किंवा पटण्यासारखे इतर काहीच नाही.
- कृपा आपल्याला बढाई मारण्यापासून दूर ठेवते. असे म्हटले

आहे, 'मी सर्व पापे केली आणि ख्रिस्ताने पापमुक्ती केली. मी त्याच्या योग्यतेचा दावा करू शकतो पण माझ्या स्वतःच्या नाही. मी जो आहे किंवा मी जे काही केले त्यामुळे मला स्वर्गात जाण्याचा काही ही अधिकार नाही. केवळ ख्रिस्त एकटा माझा 'पासपोर्ट' आहे. जर आपण कसातरी स्वर्गात प्रवेश मिळवला, समजा आपल्या कार्यक्षमतेमुळे किंवा कल्पना करा की, आपल्या चारित्र्यामुळे, तर आपण त्याबद्दल बढायाच मारत बसू आणि बढाई मारण्यासाठी चढाओढ लागेल. प्रत्येकजण स्वतःला दुसऱ्याच्या वरचढ दाखवण्याचा प्रयत्न करील. असे झाल्यास स्वर्गाचे दृष्य असे असेल जेथे लोक इतरांपेक्षा मी कसा श्रेष्ठ या बद्दल बढाया मारतील, किरकोळ कारणांवरुन भांडणे, स्पर्धा, मत्सर, व्देष, हेवा आणि चढाओढ करतील. जिकडे तिकडे सतत हेच पाहायला मिळेल. चक् स्मीथ यांनी असे वर्णन केले आहे. ''मी तिथे (स्वर्गात) तुमच्या कथा ऐकत बसलेला असेन, मनात मात्र असा विचार असेल, ''हे किती कंटाळवाणे आहे, ही पुढची व्यक्ती जरा शांत राहिली तर मी किती विस्मयकारक, महान आहे हे मी सांगू शकेन,''[१६] तो मुळी स्वर्ग नसेलच.

- तारण स्वीकारण्याची मानवावर बळजबरी नाही.[१७] तर निर्माणकर्त्याने प्रत्येकाला स्वतःसाठी स्वतंत्र नैतिक प्रतिनिधी (एजंट) बनवले आहे. हे मात्र चमत्कारिक आहे की प्रत्येकच व्यक्तीला आपल्याला तारण प्राप्त व्हावं असं वाटत नाही. देव कोणावरही स्वर्गात येण्यासाठी सक्ती करत नाही. पण हे मात्र नक्की आहे की, ज्या धर्मात बळजबरी, हिंसा व दुष्टता आहे तो खरा नाहीच.

म्हणून आपण पाहतो की, देवाचा तारणाचा मार्ग उत्कृष्ट आणि पूर्णपणे निर्दोष आहे. याव्दारे देवाच्या तारणासाठी आवश्यक त्या सर्व अटी पूर्ण होतात तरी त्याच वेळी ते तारण सर्व मानवजातीसाठी उपलब्ध आहे. प्रभु येशूने क्रुसावर जे कार्य पूर्ण केले त्यामुळे परमेश्वराला त्याच्या न्यायीपणाशी तडजोड न करता त्याच्या प्रेमाचा पूर्णपणे उपयोग करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले.

स्तोत्रकर्ता काव्यात्मकतेने म्हणतो –

> कृपा व सत्य यांचा मिलाप झाला आहे. नीति व शांती ह्यांनी एकमेकींचे चुंबन घेतले आहे.[१८]

परमेश्वराची गुणवैशिष्ट्ये समोर ठेवली आणि एकीकडे मानवाचा पापी स्वभाव पाहता तारणाचा हा एकच मार्ग शक्य होता, हे लक्षात येते. इतर कोणत्याही मार्गाने लोकांचे तारण झाले नसते.

मॅक्स् ल्यूकाडो लक्षात आणून देतात.

जगातील कोणताही धर्म अशा प्रकारचा संदेश देत नाही. इतर सर्व धर्मांमध्ये कर्माचे कडक पालन, योग्य बलिदान, योग्य पठण, योग्य रुढी–आचारपध्दती, न्याय्य सदस्यत्व किंवा अनुभव याची मुख्यत्वे मागणी केली जाते. ते देवाण–घेवाण, अदला–बदल, घासाघीस करण्याचे राज्य आहे. तुम्ही अमुक एक गोष्ट द्या आणि देव तुम्हाला 'हे' देईल. ह्याचा परिणाम काय? एक तर उध्दटपणा, घमेंड किंवा भय. उध्दटपणा किंवा घमेंड तेव्हाच येते जेव्हा तुम्हाला वाटते तुम्ही मुक्ती/तारण मिळवले आणि ते तुम्ही मिळवू शकत नाही असे वाटते तेव्हा भय वाटते.

येशूचे राज्य याच्या अगदी विरुध्द आहे. ते गोरगरिबांसाठीचे राज्य आहे. या राज्याचे सदस्यत्व विकत घेतले जात नाही तर दिले जाते. तुम्हाला 'दत्तक' घेतले जाते. हे त्यावेळी घडत नाही जेव्हा तुम्ही पुरेशा गोष्टी करता उलट जेव्हा तुम्ही पुरेशा गोष्टी करू शकत नाही तेव्हा हे घडते. तुम्हाला ते कमावता येत नाही. तुम्ही केवळ ते स्वीकारता. याचा परिणाम असा होतो की, तुम्ही घमेंडखोरपणे किंवा भितीपोटी सेवा न करता कृतज्ञतेने, आभारपूर्वक सेवेत सहभागी होता.[१९]

जॉन मॅकार्थर हे मान्य करतात की, शेवटी या जगात केवळ दोनच धर्म आहेत.

मानवजातीने किंवा सैतानाने योजलेला प्रत्येक खोटा धर्म हा

मानवाच्या गुणावगुणांचा किंवा योग्यतेचा धर्म आहे. ख्रिस्तेतर धर्म, अखिल मानवतावाद, सर्व वस्तूंत आत्मा आहे असा विश्वास असणारा धर्म आणि खोटा ख्रिस्ती धर्म हे सर्व या प्रकारात मोडतात. सदाचरण संपादणे किंवा नैतिकदृष्ट्या समर्थन मिळवणे आणि देव-दैवतांना प्रसन्न करणे हे त्यांच्या केंद्रस्थानी असते.

पवित्रशास्त्राधारित ख्रिस्ती धर्म हा एकमेव धर्म आहे जो 'ईश्वरी यशाचा' धर्म आहे. इतर धर्म सांगतात 'हे करा' ख्रिस्ती धर्म सांगतो हे केलेले आहे, आपल्या पापांच्या प्रायश्चित्ताकरीता, देव दैवतांना शांत करण्यासाठी काही चांगल्या गोष्टी करण्यासाठी भाग पाडले जाते, नाहीतर त्याने स्वीकारार्ह ध्येय प्राप्त करायचे असते.

शुभवर्तमान सांगते, पातक्यांच्या येशूवर विश्वास ठेवण्याव्दारे प्रभु येशू ख्रिस्ताचे चांगुलपण त्यांना पुरवले जाते.[२०]

स्पर्जन विचारतात :

''न्यायी राजाचे, अन्याय्यी बंडखोरासाठी मरण पत्करणे'' अशा प्रकारचा विचार तरी कोणी करू शकेल का? ही मानवी पौराणिक कथांमधील शिकवण नाही किंवा स्वप्नवत कवि कल्पना नाही. ही प्रायश्चित करण्याची पध्दत मानवांना ठाऊक आहे कारण 'हे सत्य आहे.' कल्पित गोष्टींव्दारे हे योजता आले नसते. देवाने स्वतः हे लिहीले आहे. कोणी कल्पना करण्यासारखी ही गोष्टच नाही.[२१]

## प्रकरण ३

# आता शुभवर्तमान

तारण स्वकर्माने नव्हे तर कृपेने होते असे सांगणारे पवित्रशास्त्रातील कदाचित हे सर्वात सुस्पष्ट वचन असेल.
रोम ४:४–५,

> ''आता जो काम करीतो त्याची मजुरी मेहेरबानी नव्हे तर ऋण अशी गणली जाते. पण जो काम करीत नाही तर अभक्ताला नीतिमान ठरविणाऱ्यावर विश्वास ठेवतो त्याचा विश्वास नीतिमत्व असा गणण्यात येईल.

या वचनातील पुढील काही सत्यांकडे लक्ष द्याः

जेव्हा एखादी व्यक्ती काम करते व त्याबद्दल पगार मिळवते, त्या फक्त कामावर ठेवणाऱ्या व्यक्तीच्या मालकीच्या गोष्टी असतात. ते ऋण असते, कृपा नव्हे.

देवाच्या तारणाचे तसे नाही. ते आपल्याला थक्क करून सोडणारे वाटेल! जे काम करत नाहीत त्यांचे देव तारण करतो, ते असे की, जे कमावण्यासाठी किंवा त्याकरीता स्वतःला लायक बनविण्यासाठी श्रम करत नाहीत तर तारणाचा स्वीकार 'मोफत देणगी' म्हणून करतात. काम करणाऱ्याने केवळ काम करणे थांबवायचे आणि ती व्यक्ति देवाच्या विश्रामस्थानात प्रवेश करू शकते.[२२]

आणखी एक धक्कादायक गोष्ट अशी की, देव फक्त पापी लोकांचेच तारण करतो; चांगल्या लोकांचे नव्हे, त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्यांचे नाही, तर जे स्वतः मान्य करतात की, मी पापी आहे. दुसऱ्या

शब्दात सांगायचे तर जे स्वतःच्या पापाबद्दल पश्चाताप करतात अशांचे देव तारण करतो.

'विश्वास' या शब्दावर लक्ष केंद्रित करा. तो फार महत्त्वाचा शब्द आहे. विश्वास ठेवणे म्हणजे प्रभु येशू ख्रिस्त हा माझा प्रभु, देव व तारणारा आहे असे स्वीकारणे. याचाच अर्थ असा की, आपल्या पापांची खंडणी भरणारा म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवणे. म्हणजेच स्वर्गात जाण्यासाठीची एकमेव आशा म्हणून त्याच्यावर अवलंबून राहणे. सर्व शुभवर्तमानात अविरतपणे दिलेली साक्ष हीच आहे की, तारणप्राप्ती ही प्रभु येशूवरील विश्वासाव्दारेच आहे.[२३]

कोणत्याही व्यक्तीने येशूवर विश्वास ठेवल्यास त्या व्यक्तीचे तारण होते. आणि त्याच्या ते लक्षातही येते, मात्र त्याच्या भावनांव्दारे नव्हे तर परमेश्वराच्या खात्रीशीर वचनाव्दारे त्या व्यक्तीला ते समजते.

मोकळ्या हातांनी या

आपले तारण व्हावे अशी इच्छा असेल तर स्वतःचे तारण स्वतः साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे किंवा तारण स्वतः मिळवण्याची आशा सुध्दा सोडून द्या. पुष्कळ गीतकर्त्यांनी हे खूपच चांगल्या रितीने प्रगट केले आहे. उदा. टॉप्लेडी यांचे प्रसिध्द गीत 'Rock of Ages'

## Rock Of Ages

*जरी रडे अनिवार*
*जरी सत्कृत्ये अपार*
*तरी होईना उपाय*
*बुडतो तुझ्या शिवाय*
*प्रभु ख्रिस्ता मी लाचार*
*मला तू स्वरक्ते तार*

*पुण्यहीन मी दुर्बळ*
*क्रुस धरितो केवळ*
*नग्न, वस्त्र मागतो*
*पापी, कृपा चाहतो*
*आलो शरण मलीन*
*कर साफ वा मरीन*

जे. प्रॉक्टर आपल्याला आठवण करून देतात की, आपल्या पापमुक्तीचे कार्य प्रभु येशू ख्रिस्ताने पूर्ण केले. दमूनभागून, काम करत, ओझ्याने दबून, का बरं तुम्ही एवढे परिश्रम करता? तुमचे हे 'करणे' थांबवा, फार वर्षांपूर्वीच सर्व काही केलेले आहे. ख्रिस्ताने केलेल्या कार्याला तोपर्यंत विश्वासाने बिलगून राहा. 'करीत राहणे' ही प्राणघातक गोष्ट आहे. 'करीत राहण्याचा' शेवट मृत्युत आहे.

तुमचे हे प्राणघातक करीत राहणे सोडून द्या, सोडा ते येशूच्या चरणाशी ''सर्व पूर्ण केले आहे''.

''पूर्ण झाले आहे!'' होय, खरोखर, शेवटल्या अंशापर्यंत पूर्ण झाले आहे. हे पातक्या, मला सांग, हेच तुला हवे होते, हो की नाही?

प्रकरण ४

# परमेश्वराची विस्मयकारक कृपा

अद्भुत कृपा! आपण याविषयीचे गीत गातो पण आपल्याला त्याचा खरा अर्थ माहिती आहे का?

सर्वप्रथम 'कृपा' म्हणजे काय? आपण असे म्हणून सुरुवात करू शकतो की, हे देवाचे आपल्या वरील उपकार आहेत किंवा आपल्यावर देवाचा अनुग्रह आहे. पण हे त्यापेक्षाही जास्त आहे. हा पात्रता नसलेल्यावर केलेला अनुग्रह किंवा उपकार आहे. आता एक पाऊल पुढे जाऊ हे परमेश्वराचे अनुचित उपकार आहेत, अशांवर ज्यांची पात्रता उपकाराच्या उलट गोष्टी मिळण्याची आहे. कृपा हा देवाच्या दयाळूपणा व औदार्याचा सागर आहे ज्याची खोली मोजणे शक्य नाही.

'कृपा' आणि 'देणगी' या शब्दांचे नाते जवळचे आहे. कृपा ही देणगी आहे आणि त्याच कारणामुळे ती कमावणे शक्य नाही व त्यासाठी पात्र होणे, हे ही आपण करू शकत नाही. ज्या क्षणी तुम्ही ऋण किंवा गुणवत्तेबद्दल काहीही कल्पना मांडण्यास तयार होता, तम्ही कृपेपासून दूर केले जाता. देवाची कृपा इतक्या प्रचंड प्रमाणात आहे की, त्या कृपेची परतफेड करण्याची कल्पना करणे सुध्दा अशक्य आहे. ती कृपा शब्दातीत (वर्णन करण्यापलीकडे असलेली) व आपल्या आकलनशक्ती बाहेरील आहे.

तर आता खरे शुभवर्तमान हे आहे की, तारण हे कृपेनेच केवळ विश्वासाव्दारे आहे.[२४] कृपा याचा अर्थ तुम्ही अपात्र आहात. विश्वास म्हणजे स्वतःच्या इच्छेने स्वीकारण्याची केलेली निश्चित कृती. जोपर्यंत

कृपा म्हणजे काय हे समजत नाही तोपर्यंत शुभवर्तमान समजणे अशक्य आहे.

देवाची कृपा अद्भूत आहे. ती एखाद्या पश्चात्तापदग्ध वेश्येला क्षमा देऊन शुध्द करते तिला नवीन स्त्री बनवते आणि येशू ख्रिस्तासोबत अनंतकाळाच्या वैभवात सहभागी होण्याकरिता तिचे नाव लिहिले जाते. हीच कृपा एका मरणासन्न चोराला, त्याच्या जीवनाच्या शेवटल्या क्षणी तारण देऊन, त्याच क्षणी सुखलोकात घेऊन जाते.

खुनी, वेश्या, दारुडे, चोर, लबाड अशा सर्वांचे परिवर्तन कृपेव्दारा घडते व स्वर्गात अशांचीच वस्ती होते. कोणताही पापी कृपेव्दारे तारण देण्याच्या शक्तीपलिकडे नसतो.

कृपेने हजारो–लाखो जणांना खोल गर्तेतून आणि दलदलीच्या चिखलातून काढून त्यांचे पाय खडकावर ठेवले आहेत, त्यांचा मार्ग तयार करून त्यांच्या हृदयात गीत घातले आहे. त्याच्याव्दारे ते देवाचे गौरव करीत आहेत आणि आता ते देवाच्या भव्य गृहात घेतले गेले आहेत.[२५]

ऑक्सफर्ड (आणि केंब्रिज) प्राध्यापक सी.एस्. लुईस सांगतात ''इंग्लंडमधील ते अत्यन्त अनिच्छेने धर्मपरिवर्तन केलेले व्यक्ति होते; ते पुढे म्हणतात ''अशा कृपेचा तो कसा काय यथायोग्य आदर करू शकेल ज्याव्दारे जाण्याची त्याची अजिबात इच्छा नाही आणि त्यातून सुटण्याची तो संधी शोधत आहे?[२६]

गीतकर्ता हॅल्डोअर लिलिनस जेव्हा येशूच्या अद्भुत कृपेबद्दल लिहीतात तेव्हा त्यांना बरोबर सूर सापडला आहे हे लक्षात येते. ''कृपेची व्याप्ती आपल्या पापांच्या व्याप्तिपेक्षा खूप मोठी असून ती कृपा आपल्या सर्व पाप व लज्जेपेक्षा फारच मोठी आहे.

प्रत्येक विश्वासणाऱ्याला असे म्हणणे भागच पडते की, ''मला ठाऊक नाही, देवाने माझ्यावर एवढी कृपा का केली. इतका अनुग्रह

माझ्यावर करावा अशी नक्कीच माझी पात्रता नाही. त्याने माझ्यासाठी मोजलेली किंमत खरोखरीच खूप जास्त आहे.''

'कृपा' ही कारणमीमांसा व तर्कशास्त्र या पलीकडे जाते पण त्यांचे उल्लंघन मात्र करत नाही. मेंढपाळाने आपल्या मेंढरांसाठी जीव द्यावा, एखाद्या दोषी व्यक्तीसाठी न्यायाधीशाने मरावे किंवा सर्वात विलक्षण गोष्ट म्हणजे निर्मात्याने आपल्या निर्मितीसाठी बलिदान द्यावे यासाठी कोणतेच कारण असू शकत नाही. तर्कशास्त्रात्मक दृष्ट्या पाहिले तर ते ठामपणे सांगेल की, ज्या कोणत्या कायद्याचे उल्लंघन केले असेल त्यानुसार पातकी व्यक्तीने आपल्या पापांकरीता मरावे. परंतु 'कृपा' असंभवनीय व अशक्य गोष्टी करते.

कोणी एकाने कृपेचे असाधारणपणे उत्कृष्ठ असणे पुढील प्रकारे वर्णन केले आहे. ''कृपा'' म्हणजे चांगले लोक शोधून त्यांना मान्यता देणे नव्हे, कारण चांगुलपणाला मान्यता देणे ही कृपा नसून न्याय आहे, पण कृपा म्हणजे पापी, दोषी, लाचार, मुखदुर्बल, असहाय्य असे लोक शोधून त्यांचे तारण करणे, त्यांना पापमुक्त करून त्यांचा बहुमान करणे.

## कृपा ही करुणेपेक्षा अधिक चांगली आहे.

जेव्हा एखाद्या गुन्हेगाराची शिक्षा कमी केली जाते तेव्हा आपण म्हणतो, न्यायाधीशांनी त्याच्यावर करूणा केली, त्याला अनुकंपा दाखवली. फाशी ऐवजी जन्मठेप ही करूणा होऊ शकते. त्या अपराध्याला/गुन्हेगाराला मिळायला हवी तशी योग्य शिक्षा मिळाली नाही.

कृपा ही त्यापेक्षाही अधिक चांगली आहे. ती त्या अपराध्याला निर्दोष ठरवते, त्याला प्रामाणिकपणाने पूर्णपणे भरुन टाकते आणि दोषी ठरवणाऱ्या कायद्याचा आवाज बंद करते.

## कृपा ही न्यायापेक्षा अधिक चांगली आहे.

कृपा आणि न्याय या दोन विरुध्द गोष्टी आहेत. जेव्हा एखादा माणूस असे म्हणतो की, ''मी चांगला माणूस आहे आणि मला न्याय हवा आहे.'' त्याची नरकातच जाण्याची पात्रता असते. देवाकडे कधीही न्याय मागू नये.

कृपा पावणारा म्हणतो, ''मी दोषी आहे पण प्रभु येशूने माझ्या पापासाठी खंडणी भरली आणि मी त्याला माझा प्रभु व तारणारा म्हणून स्वीकारतो. मी सार्वकालिक जीवन मिळण्यास लायक नाही पण मला ते देवाकडून मोफत देणगी म्हणून मिळाले आहे.''

प्रभु येशूने एका दाखल्याव्दारे न्याय आणि कृपा यातील फरक समजावून सांगितला आहे.[२७] 'एक शेतकरी होता आणि त्याच्या द्राक्षमळ्यात काम करण्यासाठी त्याला कामकरी हवे होते. भल्या सकाळी काही कामकरी मिळाले, त्यांनी दिवसभरच्या कामासाठी एक चांदीचे नाणे असे ठरवून घेतले.

त्यानंतर दिवसभरात आणखीही काही लोकांना त्याने कामाला लावले व जे काही तो देईल ते घेण्याच्या बोलीवर ते काम करू लागले.

दिवसाच्या शेवटी प्रथम कामाला लागले त्यांना त्यांच्या बोलीप्रमाणे एक-एक चांदीचे नाने मिळाले; बाकीच्यांनासुध्दा तेवढेच पैसे मिळाले, जे की हिशेब केल्यास एका तासाला खूप जास्त होते. पहिल्या लोकांना न्याय मिळाला, उरलेल्यांना कृपा. म्हणून कृपा ही नियमशास्त्रापेक्षा चांगली आहे.

## कृपा ही नियमशास्त्राच्या तत्त्वापेक्षा अधिक चांगली आहे.

कायमस्वरुपी सदाचरणी जीवन संपादण्यासाठी काय करावे हे नियमशास्त्र माणसाला सांगते. कृपा मनुष्याला देवासमोर कायमस्वरुपी

सदाचरणी जीवन बहाल करते आणि त्याला योग्य असे जीवन जगण्यास सांगते.

नियमशास्त्र म्हणते 'हे कर म्हणजे जगशील. ''कृपा म्हणते, ''जीवन जग म्हणजे तू हे करु शकतील.''

नियमशास्त्र म्हणते ''प्रयत्न कर आणि आज्ञा पाळ.'' कृपेच्या भाषेत सांगायचे तर, ''विश्वास ठेव आणि आज्ञा पाळ.''

नियमशास्त्र तुम्हाला काय करावे हे सांगते मात्र ते करण्याचे सामर्थ्य पुरवत नाही, उलट न केल्यास त्याबद्दल शाप किंवा दुःख देते. कृपा तुम्हाला एखादी गोष्ट करायला शिकवते आणि त्यासाठी लागणारे सामर्थ्यही पुरवते व तुम्ही ते केल्यावर बक्षीसही देते.

नियमशास्त्र उत्तमाचा सुध्दा धिक्कार करते कारण कितीही उत्तम असले तरी दहा आज्ञा पूर्णपणे पाळू शकत नाही. कृपा ही अतिशय वाईट असणाऱ्यांच्या सुध्दा दोषांचे निराकरण करते.

नियमशास्त्राव्दारे पाप उघडे केले जाते. कृपेने पाप काढून टाकले जाते.

नियमशास्त्रामुळे बढाई मारण्यास प्रोत्साहन मिळू शकते. कृपा बढाईला दूर ठेवते.

नियमशास्त्र म्हणते – ''तू हे केलेच पाहिजे .......
तू भविष्यात हे केलेच पाहिजे......... भविष्यात तू अमूक करु नये.

कृपा म्हणते, ''तुझ्याकडून या अपेक्षा आहेत...... तू असे करावे.''[२८]

एक सांगते मी काय करायला हवे तर दुसरे सांगते माझ्या नवीन स्वभावानुसार काय करायचे.

नियमशास्त्रानुसार कार्य कधीच संपत नाही. कृपा अशा एकाबद्दल सांगते ज्याने कार्य पूर्ण केले.

नियमशास्त्र हक्काने मागणी करते, ''तू प्रीति करावी..... ''कृपा घोषणा करते, ''देवाने एवढी प्रीति केली..... .

नियमशास्त्र लोकांवर जड ओझी लादते. कृपेची ओझी हलकी असतात. नियमशास्त्र ही गुलामगिरीची पध्दत आहे, तर कृपा ही स्वातंत्र्याची! दबाव आणि विशेषाधिकार हा यातील फरक आहे.

नियमशास्त्रात 'करूणा' नाही. नियमशास्त्र हे भावनाशून्य, अत्यन्त कठीण व बदलता न येणारे आहे. कृपा ही अशा परमेश्वराबद्दल सांगते ज्याच्याकडे करूणेची कमतरताच नाही.

प्रकरण ५

# कृपेचे मोल कसे ओळखावे

जोपर्यंत कृपेचे मोल समजत नाही तोपर्यंत कोणीच तिचा आनंद घेऊ शकत नाही. त्यातील चार महत्त्वाची सत्ये जाणणे आवश्यक आहेः येशू ख्रिस्त कोण आहे? त्याने काय केले? त्याने ते कोणासाठी केले? प्रभु येशू जे देऊ इच्छितो ते घेणाऱ्यासाठी त्याचा अर्थ काय?

## येशू ख्रिस्त कोण आहे?

तो आपल्यासारखा केवळ एक मानव नाही, पण खरे सांगायचे तर.....

ज्या शक्तीशाली देवाने त्याच्या अगणित चमत्कारांनी हे विश्व भरले तोच तो आहे.

तो निर्माता ज्याने आपल्या शरिराचे हजारो भाग निर्माण केले आणि आपल्यात शहाणपण, सुजाणता घातली. त्याच्या व्दारे सर्व गोष्टी अस्तित्वात आल्या व बनल्या आहेत.

तो सर्वोच्च ज्याच्याकडे सर्व शक्ती, सर्व ज्ञान आहे आणि एकाच वेळी तो सगळीकडे उपस्थित असतो, तो सर्वव्यापी आहे.

तो अतिपवित्र ज्याचा पापाशी काही सबंध नाही.

तो सर्व प्रतिष्ठा, गौरव, ऐश्वर्य, सन्मान यांनी परिपूर्ण असून जे काही शाश्वत व हवेसे वाटणारे ते सर्व त्याच्याव्दारे आहे. त्याच्या उपस्थितीत देवदूत सुध्दा आपली मुखे अच्छादून / झाकून घेतात. तो पृथ्वीवरील सर्व जले आपल्या ओंजळीत घेऊ शकतो, आपल्या वितीने पृथ्वीचे माप

घेतो आणि पृथ्वीची धूळ मोजू–मापू शकतो. तो डोंगर काट्याने व टेकड्या तराजूने मोजतो.[२९]

अशा कोणाला आपल्याबद्दल आस्था, प्रीति असावी अशी खरे तर आपली लायकी नाही.

## येशूने काय केले?

आपल्यावर प्रीति करावी यासाठी काही कारण नसताना सुध्दा त्याने आपल्यावर प्रीति केली आणि सर्व गोष्टींच्या परिपूर्ण ज्ञानाने तो ती करत राहणार व आपल्या सोबत राहणार.

ज्या वैभवशाली स्वर्गात असंख्य देवदूत त्याची उपासना करत, तो स्वर्ग त्याने सोडला आणि दुर्गंधीयुक्त गोठ्यात जन्म घेतला. पाहा, ज्याने तारकाच्छादित आकाश निर्माण केले तो गोठ्यातील गव्हाणीत निजला.

तो स्वर्गातून मानवजातीच्या घाणीत व चिखलात आला. त्यानेच निर्माण केलेल्या मानवंकडून त्याने भयंकर अपमान सहन केला. कल्पना करा, देवाचा पुत्र, याच माणसांना स्वतःच्या तोंडावर त्यांची ओंगळ लाळ थुंकू देतो. दारुड्यांच्या गीतांचा तो विषय बनतो.

आजपर्यंत कोणीही सहन केले नाही इतके त्याने सहन केले. त्याला जखमा केल्या, मारले, काट्यांचा मुगुट घुसवला. त्याला चाबकाने इतके मारले की, जमीन नांगरल्यासारखी त्याची पाठ झाली आणि त्याचा चेहरा ओळखण्यापलीकडे विद्रूप केला होता. छळ करणाऱ्यांनी त्याच्या गालावरचे केस उपटून काढले होते. त्याची सर्व हाडे ओढून, हिसकून सांध्यांतून ढिल्ली केली होती.

ग्रॅहम केंड्रीक लिहितात. ''ज्या हातांनी अंतराळात तारे भिरकावले, ते हात पाशवी खिळ्यांच्या स्वाधीन होते.''

त्या देवाच्या पुत्राला या सर्वांपेक्षा अतिशय दुःख झाले जेव्हा परमेश्वर पित्याने काही क्षण आपले तोंड फिरवले, त्याचा त्याग केला, या

दुःखापुढे त्याला शारिरीक वेदनांचे दुःख काहीच नव्हते. जेव्हा त्याने प्रार्थना केली, जणू काही स्वर्गच संपला होता. आपल्याला बहुदा हे मुळीच समजणार सुध्दा नाही. परमेश्वराने त्याच्या प्रिय पुत्रावर आपली सर्वांची पापे लादली आणि देवाच्या तीव्र संतापाचा प्रकोप झाला, त्याचा भडिमार ख्रिस्तावर झाला जोपर्यंत पूर्णपणे त्याने त्या पापांची खंडणी भरली नाही तो पर्यंत.

तो आपल्या बदली मरण पावला. इतरांनी केलेल्या पापांच्या खंडणीस्तव त्याने हे केले, कशाचीही अपेक्षा न ठेवता! त्या जुन्या खडबडीत क्रुसखांबावर, देवाचा प्रिय व मानवांतील अत्युत्तम असा तो भरकटलेल्या पाप्यांसाठी टांगला गेला.

*अद्‌भूताची अद्‌भुते! प्रचंड विस्मय !*
*यापेक्षा काय अद्‌भुत असणार*
*ज्याने हे तारकांनी भरलेले आकाश निर्मिले*
*त्यानेच माझ्यासाठी रक्त वाहिले व मरण पत्करले*
*विस्मयकारक, धक्कादायक बलिदान*
*विचारांचा गोंधळ उडवून टाकणारी*
*मती गुंग करणारी, भोवळ आणणारी किंमत भरून*
*आपली पापमुक्ती केलेली आहे!*

– अज्ञात लेखक

जे.ओ.सँडर्स लिहितात, ''येशू ख्रिस्ताच्या क्रुसखांबावरील मरणाबद्दल बहुतेक चाणाक्ष बुध्दिवंतांनी खूप खोलवर अभ्यास करून त्यातील दडलेला अंतस्थ अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला मात्र त्या अमर्याद खोलीचे गुढ उकलण्यात सर्व अपयशी ठरले. पौलाप्रमाणेच त्यांनी ही या समजण्यास कठीण अशा गोष्टीपासून माघार घेलती. ''आहाहा! देवाच्या बुध्दीची व ज्ञानाची संपत्ति किती अगाध आहे! त्याचे निर्णय किती गहन आणि त्याचे मार्ग किती अगम्य आहेत! (रोम ११:३३)

हेरॉल्ड सेंट जॉन म्हणाले की, येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभावर जाण्यात दिसणारी देवाची कृपा, जोपर्यंत आपण स्वतः अनुभवत नाही व त्याच्याइतकी महान गोष्ट आपल्या आयुष्यात दुसरी असत नाही तोपर्यंत आपण तिचे महत्त्व समजणार नाही.

स्पर्जन आपल्याला बोलावून प्रभु येशूचे महान कार्य पाहण्याचे आव्हान करतात. ''प्रभु येशू त्या क्रुसावर टांगलेला आहे..... आपल्या करिता त्याने मरणाची शिक्षा पत्करली. असे महान दृष्य तुम्हाला कधीच पाहायला मिळणार नाही, देवाचा पुत्र आणि मानवाचा पुत्र! तेथे त्या क्रुसखांबावर तो वेदना सहन करत आहे, ज्यांचे शब्दात वर्णन करणे अशक्य आहे – अन्यायांसाठी न्याय – आपल्याला देवाजवळ नेण्याचा एकमेव मार्ग.

ओह! त्या दृष्याची महानता काय वर्णावी! एक निष्पाप शिक्षा भोगत, दुःख सहन करत आहे, त्या पवित्र असणाऱ्यावर दोष लावले गेले! जो सदैव आशिर्वादित तो शापग्रस्त झाला! असीम वैभवशाली असणाऱ्या त्याला लज्जास्पद मरण पत्करावे लागले!''[३०]

ज्या प्रकारची अपमानास्पद वागणूक त्याला दिली गेली त्यासाठी तो तारणारा मुळी पात्र नव्हताच. आपल्यासाठी त्याने जी प्रचंड किंमत मोजली तेवढी आपली योग्यताही नाही. हे फारच होते. जर आपण हे पूर्णपणे आत्मसात करू शकलो तर, ''उपकारस्तुतिने आपले अंतःकरण विरघळून जाईल आणि डोळ्यातून अश्रू पाझरणे थांबणारच नाही.''

*येथे हृदये केवळ अश्रू ढाळतात.*
*बुडलेली आहेत जी कृपेच्या वैभवात.*

अर्थातच, त्याचे मरण हा शेवट नव्हता. तीन दिवसानंतर तो पुन्हा उठला. जर तो पुनरुस्थित झाला नसता तर त्याचे मरण इतरांच्या मरणाहून काही वेगळे नसते. पण ते वेगळे होते. मेलेल्यातून उठणारा तो प्रथम होता ज्याला पुन्हा मरणाचा अनुभव येणार नव्हता. वैभवी शरिराने पुनरुत्थित

होणारा तो प्रथम होता. त्याच्या पुनरुत्थानाने, पूर्ण शक्तिनिशी सिध्द केले की, तो देवाचा पुत्र आहे. त्याच्या वधस्तंभावरील कार्याबद्दलपरमेश्वर पूर्णपणे समाधानी आहे याचा हा (त्याचे पुरुत्थान) पुरावा आहे. जे सर्व त्याच्यावर (प्रभु येशूवर) विश्वास ठेवतात त्यांच्यासाठी हे वचन आहे की, ते सुध्दा वैभवी शरीराने पुनरुत्थित होतील, अगदी प्रभु येशू प्रमाणेच.

## त्याने ते कोणासाठी केले?

आपण दुष्ट पापी, कृतघ्न दुर्दैवी आणि अयोग्य क्षुद्र व्यक्ती होतो.

आपण भटकलेले, असहाय्य व आशाहीन होतो.
आपल्यासाठी केवळ नरकच योग्य होते.

आपल्यावर प्रीति करावी असे काहीही कारण नव्हते. आयुष्य चालवण्यासाठी आपल्याला अलौकिक मोठ्या भावाची गरज नव्हती.

आपण जेव्हा आपल्या सर्वोत्तम स्वरुपात होतो तेव्हा देखील आपले सदाचरण म्हणजे घाणेरड्या चिंधीसमान होते. सर्वात वाईट घडले ते म्हणजे आपण आपल्या देवाचा वध करू शकलो. संदेष्ट्याने अगदी योग्यच म्हटले आहे, ''हृदय सर्वात कपटी आहे, ते असाध्य रोगाने ग्रस्त आहे,[३१] त्याचा भेद कोणास समजतो?

एक क्षण थांबून आपण स्वतःला कोणत्या दृष्टीने पाहतो आणि देव आपल्याकडे कोणत्या दृष्टीने पाहतो या दोहोंतील फरक लक्षात घेऊ या. पुष्कळ लोकांचा स्वभाव कनवाळू, प्रसन्न आणि आपुलकीपूर्ण असतो. ते चांगले शेजारी असून चर्चला नियमित जातात. ते गरीब, आजारी अपंगाना मदत करतात. अशा अनेक लोकांना तुम्ही ओळखत असाल, तुम्हीसुध्दा त्यातील एक असाल – सभ्य, कायद्याचे पालन करणारे, मैत्रिपूर्ण आणि दिसण्यास प्रतिष्ठीत.

पण आपण विसरु नये की, देवाचे नीतिमत्व म्हणजे पूर्णावस्था आहे[३२] आणि आपण सर्व त्याच्या गौरवाला उणे पडलो आहोत. आपल्या मनातील विचारांचे जीवन उघड व्हावे अशी आपली कोणाचीच इच्छा

नाही. जरी आपण सर्व दहा आज्ञांचे उल्लंघन केलेले नाही तरी आपण ते करूही शकतो. आपण आजपर्यंत जे काही केले आहे त्यापेक्षा आपण कितीतरी वाईट आहोत. देव आपल्याकडे अत्यंत संकटात असणारे अविचारी पापी ज्यांना तातडीने तारणाची गरज आहे म्हणून पाहतो.

आपण आपल्या पातकात मरण पावलो होतो. सैतानाच्या मार्गदर्शनाने आपण या जगाच्या दुष्ट मार्गांनी चालत होतो. आपण आज्ञाभंगाची लेकरे असून आपले मन व देह यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी जगत होतो. स्वभावतः आपण क्रोधाची प्रजा होतो. ख्रिस्तविरहित, देवविरहित व आशाहीन असे जगत होतो.[३३]

आपण असे लोक आहोत ज्यांच्यासाठी ख्रिस्ताने मरण पत्करले. हे कृत्य जास्तच लक्षणीय ठरण्याचे कारण असे की, आपण इतके क्षुल्लक, क्षुद्र आहोत. जर १०,००० फुटांच्या उंचीवरुन पाहिले तर आपण अगदीच अस्पष्ट दिसू किंवा दिसणार सुध्दा नाही. मग अनेक अब्ज प्रकाश वर्षे दुरून तर आपण कितीच सूक्ष्म दिसू. व्हर्जन सी ग्राऊंडस् मान्य करतात,'' आपल्या पृथ्वीचे अतिक्षुल्लक असणे लक्षात घेतले तर या विश्वाचा निर्माणकर्ता, या दय्यम सुर्यमालेतील एका अतिसूक्ष्म ग्रहाच्या त्वचेवरील पुरळीसारखे असावेत, असे उपहासात्मक वर्णन केलेल्या मानवाच्या कुटुंबाची तो काळजी करतो यावर विश्वास ठेवणे कठीण आहे.'' आणि पुढे ग्राऊंडस् म्हणतात, ''आश्चर्यचकित करणारे सत्य म्हणजे देव खरच काळजी करतो.''[३४]

कृपेचे मोल तोपर्यंत समजणार नाही जोपर्यंत ती व्यक्ती वधस्तंभाजवळ येऊन डी.टी. नाईल्स् यांच्या शब्दांप्रमाणे कबूल करत नाही, ''मी त्याला ते केले आणि त्याने माझ्यासाठी हे केले.''[३५]

## विश्वासणाऱ्यासाठी त्याचा अर्थ काय?

विश्वासणाऱ्यां करिता कृपा सर्व गोष्टी करते त्यापेक्षा कदाचित कमी केल्या असत्या उदा. कृपेने मानवाला या पृथ्वीवर वृध्दापकाळाच्या काही दुर्बलता न येता न संपणारे जीवन दिले असते. ते किती विस्मयकारक

झाले असते. अनंतकाळच्या जळण्यापासून पुरुष व स्त्रियांना वाचवले असते.

पण अशा अर्धवट प्रमाणांवर परमेश्वर समाधानी होणार नव्हता. सर्वात उत्तम म्हणजे स्वतःच्या पुत्राचे बलिदान दिल्यावर, परमेश्वराने मनात योजल्याप्रमाणे काही ही राखून न ठेवता जो संपन्न वारसा तो त्याने आपल्याला देऊ केला.

कृपेच्या शुभवर्तमानाचे पुढे काही अंगिभूत असे लाभ दिलेले आहेत.

**आनंद** – ही सुखावण्याची अलौकिक भावना असून ती पूर्णपणे परिस्थितीच्या स्वातंत्र्यावर आवलंबून आहे. याच्या विरुधार्थी शब्द पाप नसून दुःख आहे. आनंद हा देवाबरोबरचा संबंध व प्रभु येशू बरोबरचा संबंध या व्दारे उत्पन्न होतो. म्हणून त्या संबंधा इतकाच तो ही निश्चल असतो.

**शांती** – विश्वासाव्दारे ज्यांच्या दोषांचे निराकरण झाले आहे ते देवासोबत शांतीचा आनंद घेतात. जेव्हा त्यांनी देवाला शरण जाऊन स्वतःचे समर्पण केले तेव्हाच त्यांच्यातील व देवामधील संघर्ष संपला. त्यानंतर त्याच्या पाठोपाठ इतर जगिक बाबतीतही प्रसन्नता, शांतता व संयम ही त्यांच्यात येतात कारण परमेश्वर त्यांचा चालक आहे.

**आशा** – नव्या करारामध्ये 'आशा' याचा अर्थ विशेषकरून स्वर्गातील भविष्यकाळासाठी वापरलेला आढळतो. या शब्दाच्या सामान्य वापरापेक्षा थोडासा निराळा असा हा अर्थ आहे. या आशेमध्ये शंकेच्या किंचित कणांचा समावेश असू शकतो कारण ती देवाच्या अभिवचनावर आधारलेली आहे. मात्र विश्वासणाऱ्याला स्वर्गाबद्दल इतकी खात्री आहे की जणू काही तो आत्ताच तेथे आहे.

**विश्रांती / विसावा** – जेव्हा येशूने म्हटले, ''माझ्याकडे या..... आणि मी तुम्हाला विसावा देईल.'' येथे तो तारणाच्या विसाव्याचा उल्लेख करत होता. ही अशी विश्रांती आहे की जेव्हा एखादी व्यक्ति सार्वकालिक

जीवन मिळवण्याचे स्वतःचे सर्व कार्य, प्रयत्न थांबवते आणि प्रभु येशू ख्रिस्ताने संपवलेल्या कार्यावर विसावते तेव्हा त्या व्यक्तिला ही विश्रांती प्राप्त होते. पण येशू आणखी एक विश्रांतीबद्दल बोलत आहे ''माझे जू आपणावर घ्या व माझ्याकडून शिका.... आणि तुमच्या जिवांस विसावा मिळेल.'' ही विश्रांती तेव्हा मिळते जेव्हा आपण त्याचे सौम्यपणाचे व साधेपणाचे उदाहरण समोर ठेवून त्यानुसार वर्तन करत देवाच्या कार्यात सहभागी होऊ.

**स्वातंत्र्य** – सत्य लोकांना स्वतंत्र करते, बंधमुक्त करते देहाचे लाड पुरवण्यासाठी स्वतंत्र नव्हे तर सदाचरणी, आध्यात्मिक जीवन जगून देवाची सेवा करून त्याला आनंदी करण्यासाठी स्वतंत्र करते. ख्रिस्ती लोकांना पापाच्या आधिपत्याखालून आणि नियमशास्त्राच्या बंधनामधून स्वतंत्र केलेले आहे. पण ते नियमशास्त्र नसलेले असे नाहीत. खरे तर ते प्रभु येशू ख्रिस्ताच्या प्रेमात बांधलेले आहेत.

**जीवनाचा हेतू** – जोपर्यंत व्यक्तिचा नव्याने जन्म होत नाही तोपर्यंत तिला या जगात असण्याचे कारण लक्षात येत नाही. त्यानंतरच जीवनाला अर्थ प्राप्त होतो. शेवटी त्याला कशासाठीतरी जगण्याचा आणि कोणासाठी तरी मरण्याचा अर्थ समजतो. शेवटी त्याला देवाच्या पुत्रासोबतच्या पूर्ण बांधिलकीमुळे मिळणाऱ्या परिपूर्तीचा शोध लागतो. आता त्याच्याकडे जीवनाचे तत्वज्ञान आहे. जे पूर्वीपासूनच्या निर्मितीबद्दच्या, सैतानाच्या अस्तित्वाच्या आणि मृत्युला सामोरे जाण्याबद्दलच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकते. अशी व्यक्ति घरी आलेली आहे.

**समाधान** – विश्वासणारी व्यक्ती ही स्वतःबद्दल किंवा स्वतः मिळवलेल्या गोष्टींबद्दल समाधानी नसते तर प्रभु ख्रिस्ताच्या सहवासात समाधानी असते. जसे डी.मार्टीन लॉईड – जोन्स् म्हणतात, ''माझ्या हृदयाला त्याच्यासह समाधानी असण्याशिवाय इतर कशाचीच तीव्र इच्छा नसते.''[३६]

कृपा हे सर्व पुरवते शिवाय आणखीही पुष्कळ काही पुरवते ज्या क्षणी पातकी लोक विश्वासाव्दारे प्रभु येशूचा स्वीकार करतात त्या क्षणी ते :

**सार्वकालिक जीवन प्राप्त करतात**[३७] – ही विनामुल्य भेट म्हणजे प्रभु येशू ख्रिस्ताचे (अर्पिलेले) जीवन, ज्याचे आपल्या तारणाऱ्याने अभिवचन दिले ते विपुल जीवन.[३८] ज्यांचे तारण झालेले नाही त्यांनाही अंतहीन अस्तित्व आहे, मात्र फक्त विश्वासणाऱ्यांसोबत प्रभु येशू ख्रिस्त आणि त्या वैभवी जीवनातील आशा आहे.[३९] नैसर्गिक जीवन जन्माने प्राप्त होते व मृत्युवर अवलंबून आहे. सार्वकालिक जीवन नवीन जन्माने प्राप्त होते आणि त्यांत मरण नाही. सार्वकालिक जीवन म्हणजे परमेश्वराबरोबर एकीकरण. अत्यन्त अद्‌भुत!

**क्षमा मिळणे**[४०]– कृपेच्या चमत्काराने, परमेश्वर क्षमा करतो आणि पश्चिमेपासून पूर्व जितकी दूर आहे तसे आमचे अपराध आमच्यापासून दूर करतो, पुन्हा कधीही त्यांची आठवण करत नाही. पश्चातापदग्ध व्यक्तीच्या विरुध्द असलेले दोषारोप वधस्तंभाला खिळून त्याने रद्द केले.[४१] ते आता निघून गेले. म्हणूनच डब्ल्यू गॅन्दी लिहू शकले.

*मी ऐकतो फिर्यादिची गर्जना*
*जे वाईट मी केले त्याबद्दल*
*मला ते ठाऊक आणि हजारो वर*
*यहोवा नाही शोधत त्यातील एकपण.*

**मुक्तता मिळते**[४२] – याचा अर्थ प्रभु येशूने त्याच्या रक्ताची धक्कादायक किंमत देऊन पापाच्या गुलामगिरीच्या बाजारातून लोकांना विकत घेऊन परत आणले. इतकी महागाची खरेदी आजपर्यंत कधीच झाली नाही. किती अद्‌भूत देवाण–घेवाण! यापूर्वी इतक्या लोकांनी एकाच व्यक्तिला असे देणे कधी लागले नव्हते!

**तारण मिळते**[४३] – विश्वासणाऱ्यांची केवळ नरकाच्या अनंतकालीन

शिक्षेपासून सुटका होत नाही तर सध्याच्या जगिक दुष्टेपासून त्यांचे तारण देवाच्या स्वर्गीय राज्याकरिता होते. जेव्हा प्रथम त्यांनी विश्वास ठेवला तेव्हा त्यांच्या पापांच्या शिक्षेपासून त्यांची सुटका झाली. प्रभु येशू ख्रिस्ताच्या सध्याच्या स्वर्गातील कार्याच्या शक्तीव्दारा ते तारले जातात. जेव्हा ते त्यांच्या सार्वकालिक घरी पोहोंचतील तेव्हा त्याच्या (प्रभु येशूच्या) अस्तित्वानेच त्यांचे तारण होणार.

**प्रियकराच्या ठायी स्वीकारले जाणे**[४४] – परमेश्वर त्याच्या विश्वासणाऱ्या लेकराला प्रभू येशूच्या ठायी बघतो आणि त्या आधारे त्याचा किंवा तिचा स्वीकार करतो. जो कोणी प्रभु येशूमध्ये असून परमेश्वरासमोर उभा राहतो तो त्याच्या प्रिय पुत्राव्दारे स्वीकारार्ह होतो. प्रभु येशूमध्ये असणारी व्यक्ती येशू इतकीच परमेश्वराच्या निकट असते. तो कोण आहे याबद्दल विचार केला जात नाही तर ख्रिस्ताबरोबरचे ऐक्य लक्षात घेतले जाते. त्या व्यक्तिचे कर्म नव्हे तर प्रभु येशूचे कार्य.

**प्रभु येशूमध्ये पूर्णत्व**[४५]– विश्वास ठेवण्यास कितीही कठीण वाटत असले तरी हे संपूर्णतः सत्य आहे. जो कोणी तारणाऱ्यावर विश्वास ठेवतो तो स्वर्गात जाण्यास पूर्णपणे योग्य आहे. त्याच्या योग्यतेचे कारण प्रभु येशू ख्रिस्त आहे तर पिता परमेश्वराच्या घरात जाण्यास पात्र होण्यासाठी त्या व्यक्तिला इतर कशाचीही गरज नाही. विश्वासणाऱ्याची योग्यता ही प्रभु येशूमुळे असते, ती त्याच्या स्वतःमुळे नसते. १ ते १० ची मोजपट्टी ठरवली तर तो १० वर असणार.

**जशी ख्रिस्तावर प्रीति केली तशी आपणावरही प्रीति–**

विश्वासणारा प्रभु येशू प्रमाणे देवाच्या केवळ जवळच नाही तर तेवढाच देवाला प्रिय सुध्दा आहे. देव पिता त्याच्या पुत्रावर जितके प्रेम करतो तितकेच विश्वासणाऱ्यावर देखील करतो. आपण जेव्हा म्हणतो की, 'परमेश्वर त्याच्या निवडलेल्या लोकांवर जितके प्रेम करतो त्यापेक्षा अधिक तो करू शकत नाही' तर ती अतिशयोक्ति होणार नाही. हे अद्‌भुत सत्य

आणखीन चांगले समजून, त्यावर विश्वास ठेवून त्याचा अनुभव व आनंद घेतला जाण्याची गरज आहे.

**दोषांचे निराकरण झालेला** – जेव्हा कोणी पश्चाताप न केलेली व्यक्ती परमेश्वर जो न्यायाधीश त्याच्यासमोर न्याय मिळण्यासाठी उभी राहते तेव्हा एकच निर्णय असतो – दोषी!

पण त्या आरोपीच्या पिंजऱ्यात जेव्हा एखादा पश्चात्तापी विश्वासणारा असतो, तेव्हा चित्रच बदलते.

देव तेव्हाही न्यायाधीश असतो मात्र बचावासाठी वकील प्रभु येशू ख्रिस्त असतो. जेव्हा आरोप वाचले जातात तेव्हा प्रभु ख्रिस्त पुढे येऊन म्हणतो, ''युअर ऑनर, माझा पक्षकार दोषी आहे.'' मग तो स्वतःच्या हाता, पायावरील व कुशीतील जखमांच्या खुणा दाखवून पुढे म्हणतो, ''मी त्याच्या अपराधांसाठीची शिक्षा कालवरीच्या क्रुसखांबावर भोगली आहे. मी विनंती करतो की, ह्याच्या बदली मी जे कार्य केले त्याची किंमत लक्षात घेऊन ह्याला त्याचा लाभ द्यावा.'' न्यायाधीश समाधानाने होकारार्थी मान हालवतो. ''आरोपी निर्दोष आहे.'' तो म्हणतो ''याची गणता आध्यात्मिक लोकांत करा कारण नरकात टाकावे असे एकही पाप मला याच्या ठायी आढळले नाही, खटला बंद करण्यात येत आहे!'' हे तेच उत्साहपूर्ण सत्य आहे ज्याने डब्ल्यू. नोएल टॉम्कीन्स यांना हे आव्हान मांडण्याचे धाडस दिले.

*पवित्र तारणाऱ्याकडे प्रथम पोहोंचा*
*देवाच्या प्रशंसेतून त्याला स्वीकारा*
*प्रभुवर एकतरी पापाचा डाग सिध्द करा*
*मी अस्वच्छ आहे हे सांगा मग मला!*

रॉय हेशन एका इंग्रज व्यक्तीबद्दल सांगतात, तो आपल्या रॉल्स रॉईस गाडीमध्ये, सुट्टीसाठी फ्रान्सला गेला. एके दिवशी तो बहुदा खराब रस्त्याने जात असताना दुर्दैवाने त्याच्या गाडीच्या मागच्या बाजूचा आस

(ॲक्सल) तुटला. आणि तिथल्या स्थानिक गॅरेजवाल्यांना काही तो काढून दुसरा बसवता येईना. मात्र गाडी बनवणाऱ्या कंपनीला फोन केल्याबरोबर त्यांनी नवा ॲक्सल व तो बसवून देण्यासाठी दोन कारगिर ही पाठवले. काही महिन्यानंतर कंपनीकडून बील आले नाही म्हणून त्या इंग्रज माणसाने त्यांना त्या प्रसंगाची आठवण दिली व बील पाठवण्याची विनंती केली. तेव्हा कंपनीकडून त्याला उत्तर आले की, आम्ही आमच्या सर्व नोंदी तपासल्या पण ॲक्सल तुटलेल्या रॉल्स् रॉईसची कुठेच नोंद नाही. प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांचे देखील असेच होते. देवाने काळजीपूर्वक त्याच्या सर्व नोंदी तपासल्या तरी दोषी धरण्यासाठी व शिक्षा सुनावण्यासारखे कोणतेच पाप विश्वासणाऱ्याच्या ठायी त्याला सापडत नाही.

**पापमुक्त केलेले/पवित्र केलेले**[४८]– पापमुक्त करणे म्हणजेच पवित्र करणे ही तत्वप्रणालीच्या बाबतीत घडणारी आश्चर्यकारक प्रक्रिया आहे. त्यातील वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण करायचे तर देव विश्वाणाऱ्यांना पाप आणि हे जग यापासून वेगळे करून स्वतःसोबत ठेवतो. ते जसे जेथे आहेत त्यांचे तारण होते. त्यानंतर आहे त्या स्थितीत सतत पवित्र जीवन कसे जगायचे हे त्यांना शिकवले जाते. जरी हे कार्य स्वर्गात गेल्यानंतरच पूर्ण होणार आहे.

**प्रभु ख्रिस्ताव्दारे तारलेले**[४९]– आपला प्रमुख याजक, मध्यस्थ, समर्थक आणि मदतनीस, तो कृपा, सांत्वन आणि उत्तेजन देतो. त्याच्या स्वतःच्या लोकांसाठी तो मध्यस्थी करतो. जेव्हा ते पाप करतात, त्यांनी गमावलेली सहभागिता मिळवून देण्याचे कार्य करतो. तो आपल्या लोकांची बाजू परमेश्वरासमोर मांडतो ज्यांच्या विरुध्द सैतान दोषारोप करतो.

**अंतःकरणात वस्ती करणे**[५०]– देवाच्या लेकराचा नवीन जन्म होताक्षणी पवित्र त्रैक्यातील जो तिसरा व्यक्ती तो त्या लेकरांत प्रवेश करतो. हे फार विस्मयकारक असले तरी सत्य आहे की त्या अशक्त मानवाचे शरीर येथून पुढे पवित्र आत्म्याचे मंदिर आहे. आत्मा ही पवित्रता,

उपासना आणि सेवेसाठीची शक्ती आहे. त्या नीतिमान व्यक्तिच्या स्वभाववैशिष्ट्यांमध्ये होणाऱ्या विलक्षण बदलास पवित्र आत्मा जबाबदार असतो.

**पवित्र आत्म्याव्दारे बाप्तिस्मा**[५१]– आत्म्याच्या या सेवेव्दारे जे पश्चात्ताप पूर्वक विश्वास ठेवतात त्यांना प्रभु ख्रिस्ताच्या शरीराचे सदस्य घेतले जाते. तारण प्राप्त होता क्षणी विश्वासणाऱ्याला एक असामान्य व्यक्तीगत फायदा मिळतो, तो म्हणजे' ती व्यक्ती वैश्विक मंडळीची सभासद बनते, या नविन मंडळीचे ख्रिस्त हे मस्तक असून सर्व खरे ख्रिस्ती त्याचे अवयव आहेत. ख्रिस्त व त्याचे अनुयायी आणि त्या अनुयायांची एकमेकांशी असणारी निकट बंधने शब्दात वर्णन करणे कठीण आहे.

**शिक्का मारलेले**[५२]– पवित्र आत्म्याच्या अगोदरच्या सेवेव्यतिरिक्त त्याच्याकडे शिक्का मारण्याचे काम देखील सोपवले आहे. या व्दारे मालकीहक्क दर्शविला जातो आणि सार्वकालिक सुरक्षिततेची हमी दिली जाते. रक्ताने विकत घेतलेल्या प्रत्येक पाप्यांवर त्याचा शिक्का आहे.

**आपल्या वतनाचा विसार**[५३]– विश्वासणाऱ्याला जसे पवित्र आत्मा मिळतो हे नक्की आहे तसेच त्याला वारसाहक्क अगदी स्वर्गात गेल्यावर गौरवी शरीर सुध्दा मिळणार. विसार म्हणजे अगोदर दिलेली रक्कम किंवा वचन होय. प्रतिकात्मक दृष्ट्या सांगताना पवित्र आत्मा आपल्या वतनाचा विसार आहे यासाठी मागणीच्या अंगठीची उपमाही दिली जाते.

**अभिषेक होणे**[५४]– जेव्हा एखाद्या व्यक्तिचे तारण होते तेव्हा पवित्र आत्म्याने तिचा अभिषेक होतो. यामध्ये दोन महत्त्वाच्या सेवांचा समावेश आहे. पहिली, पवित्र आत्म्याव्दारे शिकवण देण्याची सेवा. धर्मपरिवर्तन केलेल्या व्यक्तिला सत्य आणि चूक यातील फरक ओळखण्यास सक्षम करते. दुसरी अशी की, या व्यक्तिची निवड केली जाते एखादे कार्य करण्यासाठी, जसे जुन्या करारात संदेष्टे, याजक, राजे यांची निवड करून अभिषेक केला जात असे.

**प्रार्थनेव्दारे देवासमक्ष जाण्याची संधी**[५५]– किती चित्तथरारक आश्चर्य! – एका क्षुल्लक व्यक्तिला देवाच्या राज्यात त्या विश्वाच्या सर्वोच्च व्यक्तिसमोर ताबडतोब आणि कधीही जाण्याची परवानगी असणे! विश्वासाव्दारे पृथ्वीवरून तो स्वर्गातील दयासनासमोर, परमपवित्र जागी आणि जो राजांचा राजा व प्रभुंचा प्रभु त्याच्यासमोर जाऊ शकतो. हा विशेष हक्क, व्यक्तिगत फायदा असाच मिळालेला नाही, तर प्रभु येशूच्या रक्ताची किंमत देऊन विकत घेतलेला आहे.[५६]

अनेक शतकांपूर्वी क्लेरव्हाव च्या बर्नार्ड यांनी ख्रिस्ती लोकांचे प्रार्थना जीवन अधिक स्पष्ट होण्यास मदत मिळावी म्हणून असे सांगितले होते. ''अशा प्रकारे प्रार्थना करा जणू तुम्हाला नेऊन त्या अत्युच्च दयासनासमोर त्या राजासमोर ठेवले आहे, ज्याची सेवा करणारे हजारो व हजारो जण तेथे आहेत.

**नवे नागरिकत्व**[५७]– परिवर्तनामध्ये नागरिकत्व बदलाचा सुध्दा समावेश आहे– जगिक पासून स्वर्गीय. जे कधी एकदा पृथ्वीचे रहिवासी होते ते आता परदेशी, यात्रेकरु आणि अनोळखी असे झालेत. ते आता नव्या राजाला मान्यता देतात आणि त्याचे उच्च नियम पाळतात. परंतु त्याबरोबरच ते मानवी अधिकाऱ्यांना सुध्दा मान देतात व त्यांच्या आज्ञा पाळतात, जोपर्यंत त्या आज्ञा व देवाच्या आज्ञांमध्ये काही परस्पराविरोधी मते येत नाहीत. त्यांचा 'जुना देश' नाश पावणार आहे, त्यांचा नवीन देश अनंतकालीन आहे.

**देवाची मुले**[५८] – तारणामुळे पालकत्वातही बदल होतो. मुक्ती पावलेल्यांच्या जन्माच्या दाखल्यावर देवाचे नाव पिता म्हणून असते. विचार करा आपण एखाद्या अध्यक्षाचे किंवा राजाचे मूल नाही तर या जगाला निर्माण करणारा व चालवणारा जो आहे त्याचे मूल आहो! यापेक्षा मोठा सन्मान तो कोणता!

**परमेश्वराचे मुलं**[५९]– स्त्री असो वा पुरुष, सर्व विश्वासणाऱ्यांचा

परमेश्वराच्या ईश्वरी कुटुंबात एक सज्ञान व्यक्ती म्हणून समावेश केला जातो व सज्ञान व्यक्तिसाठी असणारे विशेष हक्क आणि जबाबदाऱ्या त्यांना दिल्या जातात. त्यांना कायदेशीर गुलाम असणाऱ्या मुलांसारखे न वागवता, कुटुंबातील मुला – मुलींप्रमाणे मनासारखे वागण्याची मोकळीक व स्वातंत्र्य असते.

**देवाचे वारस**[६०]– 'प्रभु येशूचे सह–वारस' हे शीर्षकच स्पष्टीकरण करणारे आहे तरी त्याची खोली लक्षात न येणारी आहे. पिता परमेश्वर आणि त्याचा पुत्र येशू यांच्या संपत्तीची मोजदाद कोण करू शकणार आहे? त्याची उत्तरे अतिभव्य येतील. तरी ती मोजून आलेली संपत्ती त्यांची आहे जे सर्व प्रभुवर प्रीति करतात.

**पवित्र आणि निवडलेले याजक**[६१]– जुन्या करारात याजकपण हे एक घराणे आणि एक कुटुंब ह्यांच्यात मर्यादित असे. परंतु नव्या करारात सर्व विश्वासणारे याजक आहेत. त्यांची दोन प्रकारची कार्ये आहेत. पहिले, त्यांचे प्रेम, जीवन , त्यांची उपकारस्तुति, मालमत्ता आणि त्यांची सेवा हे सर्व त्यांनी देवाला देऊ केले पाहिजे. त्यानंतर ज्याने अंधकारातून त्यांना स्वतःच्या अप्रतिम प्रकाशात आणले त्याची श्रेष्ठता इतरांना दाखविण्यासाठी त्यांची नेमणूक केली जाते.

**विजेत्यापेक्षा अधिक**[६२]– कोणीही विजेत्यापेक्षा श्रेष्ठ कसे होऊ शकते? एक तर तो जिंकेल किंवा नाही. जिंकण्यापेक्षा जास्त तो काय करू शकेल? इथे विचार असा आहे की, विश्वासणारे जरी युध्दाच्या ऐन भरात असले तरी आधीच ते जिंकलेले आहेत. त्या युध्दाचा निर्णय ठरलेला आहे. ते जिंकणाऱ्याच्या बाजूचे आहेत. एका विशिष्ट वेळी लाटा त्यांच्या विरुध्द असल्यासारख्या दिसतील पण या उधाणात तेच जिंकणार.

**आपले त्याच्यासारखे होणे ठरलेले आहे**[६३]– प्रभु येशूची निष्कलंक वधू म्हणून अनंतकाळसाठी त्याच्या जवळ राहायचे. डर्बी याला 'सर्व विचारांपलीकडील विचार' म्हणतात. आणि प्रभुच्या नैतिक आणि

आध्यात्मिक प्रतिमेत रुपांतर होणे, या विचाराने आश्चर्याच्या भोवऱ्यात जाऊन विचारतात –

**आणि होय का –**

*मी तुझ्या पुत्रासारखा होईन?*
*ही तिच कृपा आहे का,*
*जी त्याने माझ्यासाठी मिळवली?*
*वैभवी पित्या (विचारापलीकडला विचार) त्याच्या स्वतःच्या प्रतिष्ठेत, त्याच्या प्रतिमेत आणले!*

थोडक्यात सांगायचे तर प्रभु येशू ख्रिस्तात सर्व आध्यात्मिक आशिर्वादांव्दारे आशिर्वादित[६४], जसे देवाच्या एका मित्राने म्हटले, ''इथे काही वेळ थांबू आणि उपासना करु. निदान मी तरी तसे केलेच पाहिजे; कारण माझे आत्म्याचे डोळे दुखत आहेत. जणू काय मी सुर्याकडे बघत होतो[६५], जेन ऑस्टिन यांच्या एका पात्राच्या शब्दात सांगायचे तर, विश्वासणाऱ्यांनी त्यांच्या पात्रतेपेक्षा जास्त आनंदी राहण्याची सवय करायला हवी[६६].

## कृपा तिच्या महत्तमतेत

खरेतर येशूचे विश्वासणारे आत्ताच्यापेक्षा अधिक सुस्थितीत असते जर या जगात पापाचा प्रवेशच झाला नसता. हेच वेगळ्या प्रकारे सांगायचे तर विश्वासणारी व्यक्ती अधःपतन न झालेल्या आदामापेक्षा प्रभु येशूमध्ये अधिक चांगल्या स्थितीत असती. पुढील ओळी किती सत्य आहेत.

*प्रभु येशू मध्ये असल्याने आपण आहोत आशिर्वादीत*
*आदामाने पापामुळे गमावले अनेकोत्तम आशिर्वाद.*

मूळच्या निष्पाप आदामाचा त्याच्या स्वकीयांनी स्वीकार केला नसता आणि तो ख्रिस्तामध्ये परिपूर्ण झाला नसता. तो कधीही देवाचे मूल झाला नसता. त्याला स्वर्गातील घराची आशा मिळाली नसती किंवा प्रभु

ख्रिस्ताच्या प्रतिमेशी तो तंतोतंत जुळला नसता. वर सांगितलेले आशीर्वाद त्याला कधीच उपभोगता आले नसते.

जोपर्यंत त्याने पाप केले नव्हते त्याला या भूतलावर अखंड आयुष्याची खात्री होती. मात्र त्याला प्रभु ख्रिस्तामुळे जीवन मिळाले नव्हते. त्याच्यामध्ये पवित्र आत्म्याने नेहमीसाठी वस्ती केली नव्हती. एका पाप्याला कृपेव्दारे मिळणारे विशेष हक्क, व्यक्तिगत फायदे त्याला मिळाले नव्हते.

आदाम व हवेच्या बाबतीत अशी प्रचंड शक्यता नेहमीच राहिली असती की, ते पाप करतील व दोषपात्र होतील आणि मृत्युचा धोका टांगत्या तलवारीप्रमाणे त्यांच्यावर लटकत राहिला असता. आपल्याला माहिती आहे की, आदामाने पाप केले आणि त्या पापाव्दारे दुःख, शोक, यातना व मरण यांचे जणू डोंगर कोसळले. परंतु परमेश्वराने त्यातून तारणाचा मार्ग पुरवण्यासाठी स्वतःच्या पुत्राला पाठवले आणि मानवाला मोजदाद करता येणार नाही अशा प्रकारे समृध्द केले, कधीही पाप न करण्यापेक्षा क्षमा पावलेला पापी अधिक श्रीमंत असतो. ''पाप मुबलक आहे (पण) कृपा त्यापेक्षा फार विपुल आहे.''[६७] सुरुवातीपासून शेवटापर्यंत देवाचा अनुग्रह म्हणजे कृपा. ती अत्यन्त अद्‌भुत, आश्चर्यकारक, अतर्क्य व समृध्द करणारी आहे.

प्रकरण ६

# 'सुवार्ता' जी खोटी आहे

एक वेगळी 'सुवार्ता' आहे, जी खोटी सुवार्ता आहे. ती अजिबात चांगली वार्ता नाही आणि तरी जगातील जास्तीत जास्त लोक त्या संदेशावर विश्वास ठेवतात. त्या संदेशानुसार चांगले लोक स्वर्गात जातात. त्यात असे म्हटले जाते की, तुम्ही तुमचे तारण तुमच्या चांगल्या कर्माव्दारे मिळवू शकता किंवा चांगल्या चारित्र्यामुळे ते तुम्हाला मिळते. जगातील बहुतेक धर्मांमध्ये हीच किंवा वेगवेगळ्या प्रकारे अशीच तत्वप्रणाली शिकवली जाते. लोकांना ती योग्य वाटते परंतु पवित्र शास्त्र सांगते याचा अंत मृत्युत आहे, म्हणजेच देवाबरोबर अनंतकाळासाठी ताटातूट.

हे काही नवीन नाही. खरेतर हे सर्व मागे एदेन बागेतच जाते. आदाम आणि हवा यांनी त्यांची पापमय नग्नात झाकण्यासाठी अंजिराच्या पानांची कटिवेष्टने केली. परमेश्वरासमोर स्वतःला सादर करण्यायोग्य बनवण्यासाठी त्यांनी स्वतः काही करण्याचा प्रयत्न केला. पण देवाला त्यांना दाखवून द्यायचे होते की, ही त्यांची मोठी चूक आहे. तेव्हा परमेश्वराने चर्मवस्त्रे (प्राण्याच्या कातड्यापासून बनवलेली) करून त्यांना घातली. हे करण्यासाठी त्या प्राण्यांना मरावे लागले. त्यांचे रक्त सांडले गेले. आदाम आणि हवा यांना मात्र देवाने त्यांच्यासाठी केलेली तरतूद विश्वासूपणे स्वीकारावीच लागली. देव त्यांना हेच शिकवत होता की, पाप त्यांना देवापासून दूर करते आणि त्यासाठी पातक्याला देवाकडेच यावे लागते. त्या मानवाच्या ऐवजी ज्याने स्वतःचे रक्त सांडले त्याच्याकडे.

काईनाने त्याच्या पालकांच्या चूकीवरून शिकायला हवे होते. ते लक्षात घेण्याऐवजी त्याने रक्तविरहित अर्पण देवासमोर आणले, त्याच्या शेतातील उत्पन्न म्हणजे स्वकष्टार्जित गोष्टी. हे देवाने दाखवून दिलेल्या मार्गाचा नकार करणे होते आणि हा जाणून-बुजून केलेला परमेश्वराच्या शब्दाचा अस्वीकार होता, याची निष्पत्ती म्हणजे अनंतकालीन अधोगती. खोटी सुवार्ता बरोबर वाटते पण ती मृत्युकडे घेऊन जाते.

इतक्या शतकानंतरही हा पसंतीचा धर्म आहे. एकदा अमेरिकेच्या अध्यक्षांच्या कायद्यातील २ ऱ्या मदतनीसाचे निधन झाले त्यावेळी भाषण करताना अध्यक्ष म्हणाले, ''मला मनापासून आशा आहे की, ह्यांच्या चांगल्या जीवनामुळे आणि त्यांच्या सर्व उत्तम कार्यामुळे त्यांच्या आत्म्याला कृपा व तारण प्राप्त होईल. एक प्रख्यात पाळक, जे सकारात्मक विचारसरणीला महत्त्व देण्यासाठी प्रसिध्द होते ते एकदा म्हणाले, ''कारण आपण चांगले विचार करतो आणि चांगली कामे करतो, आपल्याला विश्वास आहे की आपण स्वर्गात जाऊ.''

एक विश्वासू पाळक चाळीस मिनीटे प्रवचन करतात व ऐकणाऱ्यांना हे सत्य सांगतात की, तारण हे आपल्या कर्माने नव्हे तर विश्वासाच्या व्दारे कृपेने प्राप्त होते. उपासनेनंतर मंदिराच्या दरवाजाजवळ उभे असताना एका पाहुण्याला ते विचारतात'आपले तारण झाले आहे. का?'' तो पाहुणा उत्तरतो, ''माझे कसोशीने प्रयत्न चालू आहोत.''

एक ख्रिस्ती व्यक्ती दुसऱ्या नवीनच ओळख झालेल्या व्यक्तिला विचारते, ''तुझे तारण झाले आहे का?'' ती व्यक्ती उत्तरते, ''ते कोणाला कसे ठाऊक असणार?'' त्याच्या लक्षात आले होते की, आपल्या कर्मावर किंवा चारित्र्यावर जर तारण होणे किंवा न होणे अवलंबून असेल तर आपण त्यासाठी पात्र आहोत किंवा नाही हे त्या व्यक्तिला समजणे शक्य नाही. हे ध्येय अत्यन्त अनिश्चित व चटकन निसटून जाणारे आहे.

कर्मावर तारणप्राप्ती हे मानवांच्या मनात इतके खोल रुजले गेले

आहे की, ते मुळासकट काढून टाकण्यासाठी देवाच्या आत्म्याला अद्भुत, अलौकिक कार्य करावे लागते. लोकांना हे म्हणायला आवडते की, ते स्वतःच स्वतःचे तारण करू शकतात. किंवा निदान त्यांच्या तारणाच्या प्रक्रियेस हातभार लावू शकतात. त्यामुळे त्यांचा अहंकार सुखावतो. स्वतःबद्दल असा विचार करायला त्यांना आवडत नाही की, कोणाच्यातरी कृपेवर किंवा दयाळूपणावर ते अवंलंबून आहेत. ते स्वतःचे तारण स्वतः मिळवू शकत नाहीत हा विचार सुध्दा त्यांच्यासाठी क्षोभकारक असतो.

आणि म्हणून तारणासाठी ते चिकाटीने चांगली कार्ये आणि उत्तम चारित्र्य यालाच बिलगून राहतात. पुष्कळदा अनेक लोकांचे कृपेव्दारा तारण होते तरी एखाद्या लहानशा चुकीमुळे ते पुन्हा त्यांच्या जुन्या कल्पनेकडे वळून आपले तारण अबाधित ठेवण्यासाठी कार्य करण्याची धडपड करू लागतात. आजच्या मंडळ्यासुध्दा या पाखंडी मताने बिघडलेल्या आहेत.

या खोट्या सुवार्तेशी निकट संबंध असणारे शब्द म्हणजे नियमशास्त्रानुसार आचरण, कार्य आणि ऋण. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर 'तारण हे असे ऋण आहे जे पातकी माणसाला त्याच्या नियमशास्त्रानुसार वागण्यासाठी किंवा पुण्यकर्मासाठी देव देणे लागतो. कल्पना अशी आहे की, देव जो न्यायाधीश त्याच्या हातात तराजू आहे. त्यामध्ये एका पारड्यात व्यक्तिची पुण्यकर्मे व दुसऱ्यात दुष्कर्मे घालतो आणि त्यातील जे पारडे जड होईल त्यावर त्या व्यक्तिचे भवितव्य ठरते. स्वर्ग किंवा नरक. अर्थात ती व्यक्ती मरेपर्यंत तिलाही सांगता येत नाही की, तराजूचे कोणते पारडे जड भरेल.

ती कृपा नव्हे. कृपा आणि कर्म हे दोन्ही एकमेकांच्या विरुध्द आहेत. ज्या क्षणी त्या दोहोंना एकत्र करण्याचा प्रयत्न करतो तेथे कृपा उरतच नाही.[६९] उदाहरणार्थ, आम्ही ख्रिस्ती जीवन जगल्याने तारणप्राप्ती झाली असे म्हणणे म्हणजे ती कृपा नव्हे. आमच्या या कृत्यांव्दारे आम्हाला तारण मिळाले असे म्हणणे की, विश्वास आणि कृत्ये यामुळे तारणप्राप्ती

झाली तर ती सुध्दा कृपा नव्हे. कृपा आपल्याला हे बजावून सांगते की, हे विश्वासाने कृपेव्दारेच व इतर कशानेही नाही.

## श्रीमंत मात्र दुःखी तरूण अधिकारी –

एक श्रीमंत तरूण अधिकारी होता, ज्याचा कर्माव्दारे तारण यावर विश्वास होता.[७०] त्याने प्रभु येशूकडे येऊन विचारले, ''काय केल्याने मला सार्वकालिक जीवन हे वतन मिळेल?'' त्याला त्याचे तारण स्वतः कमवायचे होते.

जेव्हा प्रभु येशूने दहापैकी सहा आज्ञांबद्दल विचारून कर्माव्दारे स्वर्गात जाणे किती कठीण आहे. हे त्याच्या लक्षात आणून दिले, तरी त्या तरूण अधिकाऱ्याचे अहंकाराने बढाई मारली की, तो सर्व आज्ञांचे पालन करतो. मात्र प्रत्यक्ष तो करत नव्हता. तो त्याच्या शेजाऱ्यावर स्वतःप्रमाणे प्रीति करत नव्हता. जर करत असता तर त्याने त्याची संपत्ती गरीबांना दिली असती. लोभीपणाचे पाप तो करत होता. दहापैकी एकही आज्ञा मोडण्यामुळे त्याने सर्व दहा आज्ञा मोडल्या होत्या कारण सर्व आज्ञा साखळीप्रमाणे एकमेकींशी जोडलेल्या आहेत. त्याला कृपेव्दारे तारण मिळवण्याची गरज होती कर्माव्दारे नव्हे.

## स्वर्गाचे बनावट तिकीट

बहुतेक मनुष्यांच्या मनात खोलवर रुजलेले पाखंडी मत असे आहे की, तारण हे कर्माने प्राप्त करता येते व चांगले लोक स्वर्गात जातात. पुढे नमुन्यादाखल काही कर्मे दिलेली आहेत त्यांना लोक स्वर्गाते तिकीट समजून त्यावर अवलंबतात.

## धार्मिक विधींचे पालन

**बाप्तिस्मा** – हे लक्षात घेण्याची गोष्ट आहे की, बाप्तिस्मा हा विधी ज्यांचे तारण झालेले आहे त्यांच्यासाठीचा आहे. हे लोकांसमोर

ख्रिस्ताचा स्वीकार केल्याचे कबूल करणे आहे आणि प्रभु येशू सोबत, त्याच्या मरणात, पुरले जाण्यात व पुन्हा उठण्यात स्वतःची ओळख पटवणे आहे.

**दृढीकरण** – ही मंडळीने सुरु केलेली परंपरा आहे. पवित्र शास्त्रात याचा कुठेच उल्लेख नाही आणि त्यामुळे दृढीकरण हे तारणासाठीचे साधन नाहीच.

**पापकबुली** – माणसाकडे पापकबुली केल्याने पापांची क्षमा होऊ शकत नाही. पाप्याचा प्रभु व तारणारा या नात्याने येशूने त्या पाप्यासंबंधी दिलेली पापकबुली ऐकण्याची परमेश्वर वाट पाहत आहे.

**पवित्र सहभागिता** – बाप्तिस्म्याप्रमाणेच हा विधीसुध्दा निश्चित ख्रिस्ती असणाऱ्यांसाठी आहे, मात्र प्रभु येशूच्या मरणाचे स्मरण ठेवण्यासाठी हा विधी करायचा आहे.

**प्रायाश्चित करणे** – स्वतःच्या पापांबद्दल प्रायश्चित करण्यासाठी लोक कोणत्याही कृती करण्यात स्वतःला व्यस्त करून घेतात. नव्या करारात (Penance) 'प्रायाश्चित करणे' हा शब्द सापडत नाही. पापी लोकांनी पश्चात्ताप करावा अशी देवाची ईच्छा आहे. ते अशासाठी की, त्यांनी आपली पापे ओळखून, क्षमेसाठी परमेश्वराकडे वळावे.

**मंडळीचे सभासदत्व** – एकच सभासदत्व खरे आहे ते म्हणजे खऱ्या मंडळीचे सभासदत्व म्हणजेच ख्रिस्ताच्या शरीराचे अवयव असणे, जे खऱ्या विश्वासणाऱ्यांव्दारे बनते. मात्र हे तारण प्राप्त करण्याचे साधन नाही.

**दशांश देणे** – विश्वास न करणाऱ्या व्यक्तिसाठी त्याच्या मिळकतीमधील ठराविक टक्के भाग चर्चमध्ये दिल्याने आपल्याला तारण मिळेल असा समज असल्यास त्या देण्याला काहीच अर्थ नाही, जोपर्यंत ते देवासमोर योग्यता मिळवण्याशी संबंधित आहे. खरे पाहिले असता देवाला त्याचे पैसे नको आहेत. देवाला त्याचा पश्चात्ताप आणि विश्वास बघायला हवा आहे.

**उपवास** – स्व–नकार हा वैयक्तिक आरोग्यासाठी चांगला असू शकतो. ख्रिस्ती लोकांना आध्यात्मिक एकाग्रतेसाठी त्याची मदत होऊ शकते. पण विश्वास न ठेवणाऱ्यांसाठी ते देवाला संतोषविण्याचे निरुपयोगी साधन आहे.

**प्रार्थना** – तारण न झालेल्या व्यक्तिकडून देव पुढील प्रार्थना करण्याची अपेक्षा करतो, 'हे परमेश्वरा, माझ्यावर कृपा कर, मी पापी आहे, मला प्रभु येशू व्दारे तारण दे.

**शेवटच्या (मृत्यु) समयी तेल लावण्याचा विधी** – या विधीमध्ये मरणासन्न व्यक्तिच्या आरोग्यासाठी आणि तारणासाठी पाळक प्रार्थना करतात. दुःखाने म्हणावे लागते की, या विधीला पवित्र शास्त्राव्दारे कोणताच अधिकार किंवा कसलीच हमी दिलेली नसल्यामुळे त्याचा या पृथ्वीवर किंवा अनंतकालीन जीवनासाठीही काहीच उपयोग होत नाही.

## नियमशास्त्र पाळणे –

**दहा आज्ञा** – आपण पुढे पाहणार आहोत की, नियमशास्त्राचा उद्देश पाप उघड करून दाखवणे हा आहे आणि ते धुवून टाकणे हा नाही.

**सुवर्णनियम** – लोकांनी जसे तुमच्याशी वागावे म्हणून तुमची इच्छा आहे तसेच तुम्ही त्यांच्याशी वागा हे फार उत्कृष्ट धोरण आहे. परंतु त्याचे संपूर्णतः पालन करणे मानवाच्या शक्तीपलीकडचे आहे.

**इतर कोणतेही नियम** – नव्या करारात फार परिणामकारक रीतीने हे शिकवलेले आहे की, मनुष्य असे काही ही प्रशंसनीय किंवा गुणवत्तापूर्ण करू शकत नाही ज्याकडून त्याचे तारण होईल.

## चांगले चारित्र्य –

**चांगले जीवन जगणे** – आपण कितीही चांगले जीवन जगत असलो तरी देवाच्या समोर त्याच्या प्रमाणात ते कमीच पडते, त्याचे प्रमाण म्हणजे त्याचा पुत्र, प्रभु येशू ख्रिस्त. केवळ एक पाप मानवाला पापी

बनवते व पापाचे वेतन मरण आहे.

**इतरांपेक्षा चांगले असणे–** जवळजवळ सर्वच जण म्हणू शकतील की, मी अमुकएका पेक्षा चांगला आहे. एखाद्या ठरवलेल्या मातनदंडापेक्षा कोणीतरी कमी असतेच. क्षमस्व, या बढाईचा काही उपयोग नाही. जर हे पुरेसे असते तर सर्वात वाईट एखादा सोडून सगळेच स्वर्गात गेले असते.

## चांगले कार्य / पुण्यकर्म –

**धर्मादाय देणग्या –** गरजू लोकांबद्दल अनुकंपा, दया असेल तर आपल्याकडे जे आहे त्यातून त्यांना देणे गरजेचे ठरते आणि अशा देणग्यांच्या विरेधात बोलणे म्हणजे मातृत्वाविरुध्द बोलण्यासारखे आहे. पण इथे मुद्दा असा आहे की, ते पापासाठीचे प्रायश्चित होऊ शकत नाही.

**आपल्या परीने चांगले ते करणे –** हे प्रत्येकानेच केले पाहिजे. परंतु चांगली कामे 'तारक' नाहीत. प्रभु येशू आहे.

## अनुवंशिकता –

**धार्मिक माता–पित्याच्या पोटी जन्मणे–** तारणाचा अनुवंशिकतेशी काही संबंध नाही. ते रक्ताव्दारे संक्रमित होत नाही. उलट प्रत्येक व्यक्तिने सुवार्तेला स्वतः प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

**कुटुंबामध्ये पाळक, धार्मिक अधिकारी किंवा धार्मिक शिक्षक असणे –** कोणा दुसऱ्याच्या व्यवसायाव्दारे कोणी विश्वासणारा बनू शकत नाही. आपल्या मानवी संघटनांव्दारे आपले तारण होऊ शकत नाही.

## इतर –

**चांगले माता–पिता असल्याने किंवा कुटुंब चांगले वाढवल्याने –** हे स्तुत्य आहे पण पुरेसे मात्र नाही. आपण जे काही चांगले करू शकतो ते करावे मात्र त्यामुळे आपले तारण होत नाही.

**यातील एकानेही नाही–किंवा यातील कोणाच्याही एकत्रीकरणाने नाही –** या कशानेच व्यक्तिचे तारण होऊ शकत नाही. जर तसे होऊ

शकत असते तर प्रभु ख्रिस्ताला मरण्याची गरजच नव्हती. तो मेला, पुरला गेला आणि मेलेल्यांमधून पुन्हा उठला याचे कारण असे की, तारण मिळण्यासाठी त्याच्यावरील विश्वासाशिवाय दुसरा कुठलाच मार्ग नाही.

जर तुम्ही वरील यादी पाहिली तर त्यातील एकही अशी गोष्ट नाही जी जगातील प्रत्येकाच्या अवाक्यातील आहे. खरेतर, तुम्ही अशा कुठल्याच तथाकथित कार्याचा विचार करू शकत नाही, ज्याला अपवाद न ठेवता प्रत्येक जण पुरे करू शकेल, जेव्हा तुम्ही अशा लोकांचा विचार करता, ज्यांना हात किंवा पाय नाहीत; जे अंध आहेत, गरीब आहेत किंवा मरणाच्या दारात आहेत; तुमच्या लक्षात येईल, पुण्य कर्माव्दारे किंवा कार्यव्दारे तारण ही संकल्पना म्हणजे हलक्या प्रतीची किंवा खोटी सुवार्ता होईल. त्यामध्ये कसलीच चांगली वार्ता नाहीत.

शतकानुशतके मानवी मन योजू शकेल अशा निरनिराळ्या युक्त्या व डावपेचांव्दारा स्वर्ग मिळवण्याचा मानव प्रयत्न करत आहे जसेः चिंतन, ध्यान, स्वनकार, साधेपणा, शरीराला यातना देणे (गुढग्यावार चालत पायऱ्या चढणे इ.) तीर्थयात्रा, भिक्षुकी जीवन किंवा पैसे देणे. या सर्व निरर्थक कृती आहेत. प्रभु येशू ख्रिस्ताच्या रक्ताशिवाय कशानेही पापाचे डाग धुतले जाऊ शकत नाही.

## प्रभु येशु ख्रिस्त आणि प्रभुच्या नावासह जोडले जाणारे (चुकीचे) मानवी युक्तिवाद

तारण, उध्दार, सार्वकालिक जीवन याकरिता प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणे गरजेचे आहे असे अनेकजन मान्य करतात. पण त्यासहच ते काही अधिकच्या गोष्टीही त्यास जोडतात. मंडळीच्या सुरुवातीच्या काळात सुन्तेच्या आवश्यकतेबद्दल शिक्षण देणारे काहीजण होते. आजच्या काळात असे लोक ठराविक बाप्तिस्मा, अन्य भाषेत बोलणे, शब्बाथ आणि नितीमियमशास्त्राचे पालन अशा तत्सम गोष्टींची उगाच पुरवणी जोडू पाहतात

जे अतिशय चुकीचे आहे. आपला प्रभु येशू ख्रिस्त हाच केवळ एकमेव आणि समर्थ तारणारा उद्धारक आहे. आणि त्याच्या ह्या बहुमानावर कोणीही अथवा काहीही हक्क मांडू शकत नाही. तारण हे केवळ विश्वासाव्दारे कृपेने लाभते. कृपा आपल्या प्रभुची, तर विश्वास आपला!

## निराळ्या पण फसव्या वर्तमानाचा पर्दाफाश

निराळे वर्तमान 'सुवार्ता' म्हणून मांडण्याचा जो फसवणुकीचा प्रयत्न केला जात आहे त्यात अनर्थ आणि दोषांव्यतिरिक्त काहीही नाही. पवित्रशास्त्र वारंवार बजावत आहे की केवळ नियमशास्त्रातील कर्म-कृत्य वा सत्कृकत्यामुळे कोणासही तारण लाभणार नाही.[७१] किंवा कोणाच्या पापांची भरपाई होणार नाही.

पवित्रशास्त्र हेहि सांगते कि आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर आपला तारणारा प्रभु येशू ख्रिस्त याच्या ठायी आपल्यावर करण्यात आलेल्या कृपेमुळे आपणास तारण लाभते.[७२]

स्वकृत्यांनी स्वतःचे तारण साधू पाहणे कोणाच्याही आवाक्याबाहेरची गोष्ट आहे. कोणत्या सत्कृत्यामुळे किंवा एखादे कर्म किती प्रमाणात, किती काळ केल्यास तारण लाभेल हे कोणासही सांगता येत नाही. पण जेव्हा तुम्हांस कृपेव्दारे तारण लाभते तेव्हा सर्वसमर्थ परमेश्वराच्या अभिवचनाव्दारे ते तुम्हांस जाणवते. तारणाची देणगी लाभताक्षणी आपणास जाणीव होते. पवित्रशास्त्रातही सांगितले आहे, ''ह्या कारणास्तव ते अभिवचन कृपेच्या योगे असावे म्हणून ते विश्वासाने आहे; अशासाठी की... त्याला अनुसरुन जे चालतात, त्यांनाही निश्चित व्हावे.''[७३]

नियमशास्त्राधीन असलेला मनुष्य स्वतःस अनंतकालासाठी कधीही राखू शकत नाही कारण तो भविष्यात काय करेल अथवा पुढे त्याच्या हातून काय घडेल हे त्यालाही ठावूक नसते. आणि या कर्म-कृत्यांचे अवडंबर

माजवणाऱ्या फसव्या कुवार्तेमध्ये अनिष्टता आणि दोष हाच की ते केवळ ''मी–पणा'न चाच स्तोम करू पाहते.

कृपेव्दारे लाभलेल्या तारणाव्दारे आपल्याला हीच शाश्वती मिळते की – उत्तम मेंढपाळ ख्रिस्त प्रभु त्याच्या कळपातल्या मेंढरा पैकी कोणतेही मेंढरु हरवू देणार नाही.

जॉन केंट आपल्या गीतामध्ये हाच विश्वास प्रदर्शित करतातः *''ख्रिस्ताशी चिरकालिक जडल्यावर,*
*काहीही त्याच्यापासून तोडू शकणार नाही मजला,*
*ख्रिस्तामध्ये मी आता सर्वदा, हाच सनातन करार सर्वकाळ लाभला,*
*तारणाऱ्या उद्धारकापासून दूर करण्यास, नाही कोणी समर्थ तितुका''*

जे लोक ख्रिस्ताच्या कृपेशिवाय स्वकर्म–कृत्यांव्दारे तारण मिळवू पाहतात ते अविरत राबणाऱ्या गुलामासारखे आहेत जे कष्ट तर करतात पण त्यांच्या पदरी काहीही पडत नाही.

ख्रिस्ताने विश्वासणाऱ्यांकरिता अभिवचन दिले आहे की, जेव्हा तो त्यांना पापमुक्त करितो तेव्हा ते सर्व बंधनातून मुक्त होतात.

फसवे वर्तमान ''करा–करा'' चा घोषा लावते पण कृपेचे शुभवर्तमान तुम्हाला ''पूर्ण झाले आहे' हा दिलासा देते. ख्रिस्ताने तुमच्या आमच्या तारण–उद्धाराकरिता महान कार्य पूर्ण केले आहे. आता आपल्याला केवळ विश्वासाव्दारे त्याची कृपा मिळवणे आहे. दुसरे काहीही नाही!

मानवाचा स्वभाव पाहता त्याला कृपा रुचत नाही. ती कृपा त्याला स्वतःला नको असते आणि देवाने ती इतरांवरही करू नये असेच त्याला वाटते. माणसाचा हा स्वभाव गोठ्यातील कुत्र्यासारखा आहे जो स्वतः चारा वैरण तर खात नाहीच पण ती खाणाऱ्या इतर प्राण्यांना पण तो भुंकून दूर

पळवून लावतो. प्रभु येशूच्या काळातील शास्त्री–परुश्यांनी असेच वागून सर्वसामान्यांना स्वर्गीय राज्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांचा देवाच्या राज्यात प्रवेश तर झाला नाहीच पण त्यांनी इतरांनाही प्रतिबंध केला. केवळ नियमशास्त्र पाळणारेही तसेच... देवाच्या वाचनांवर त्यांनी स्वतःही विश्वास ठेवला नाही आणि त्यांनी लोकांपर्यंत देवाचे वचन पोंहचू दिले नाही.

नियमशास्त्र कृपेचा छळ करिते, दासीपुत्र इश्मायेलाने इसहाकाचा छळ केला या घटनेचा दाखला देऊन पौल आपणासमोर हे तथ्य उदाहरणासहित मांडतो.[७४] प्रभु येशू ख्रिस्ताला वधस्तंभी देण्यात आले तेव्हा तर हा छळ उघडपणे करण्यात आला. ज्या तारणाऱ्याने कृपा व सत्य सर्वांसमोर सर्वांच्या उद्धाराकरिता आणले, त्यालाच मारून टाकण्याचे कट–कारस्थान या कायदेपंडित शास्त्र्यांनी रचले होते.

प्रकरण ७

# खरा विश्वासणारा ओळखणे सोपे आहे

''तुमचे तारण झाले आहे का?'' किंवा तुम्ही ख्रिस्ती आहात का?'' या साध्या प्रश्नांव्दारे तुम्ही एखाद्या व्यक्तिची तत्वे नीतिनियमशास्त्रावर की कृपेवर आधारलेली आहेत हे जाणून घेऊ शकता.

जो खरा विश्वासणारा आहे त्याचे उत्तर काहीसे खालील प्रमाणे असेलः

''होय, माझे तारण झाले आहे पण ते केवळ आणि केवळ परमेश्वराच्या कृपेमुळेच, माझ्या तारणासाठी मी स्वतः काहीही करण्यास समर्थ नाही.''

कृपेची उत्तम पारख असलेल्या व्यक्तिंची काही संस्मरणीय उदाहरणे आपल्या पवित्र शास्त्रात आहेत.

रूथ ही समाजाने तिरस्कृत केलेल्या, भरडल्या जाणाऱ्या अल्पसंख्याक गटातील एक सदस्या होती. त्यामुळे बवाज नामक मनुष्याकडून जेव्हा तिला अनपेक्षितरित्या विशेष सहानुभूतिपुर्वक, दयाळूपणाची वागणूक मिळते तेव्हा ती म्हणते, ''मज परक्या स्त्रीवर आपण कृपादृष्टि करून माझा समाचार घेतला याचे काय कारण बरे?''[७५] रुथला कृपेचा अर्थ उमगला होता.

परमेश्वराने दाविदाशी करार केला तेव्हा दाविद म्हणतो, ''हे प्रभो देवा, मी कोण व माझे घराणे काय की तू मला येथवर आणावे?''[७६] आपण या कृपेस पात्र नाही हे दाविद जाणत होता.

योनाथानाच्या पुत्रास (मफीबोशेथ जो पायांनी अधू होता) दाविद

जेव्हा आपलेसे करून दया दाखवतो तेव्हा मफीबोशेथ त्यास विचारतोहि की, ''आपण अशा मजसारख्या मेलेल्या कुत्र्यावर कृपादृष्टि करावी असा आपला दास कोण आहे?''[७७] तो जाणून होता ज्या शौलाने दाविदाला जीवे मारण्याचा अनेकदा प्रयत्न केला त्याच शौलाचा तो नातू होता म्हणून दाविद सूडापोटी त्यास मारु शकत होता.

पौल जो त्याच्या पूर्वायुष्यात शौल असता ख्रिस्त शिष्यांचा, मंडळीचा छळ करीत होता त्यास प्रभुचे पाचारण झाल्यानंतर सेवेत असताहि तो स्वतःला प्रेषित म्हणवून घेण्यास संकोचत असेः ''मी जो सर्व पवित्रजनांतील लहानाहून लहान व त्या माझ्यावर ही कृपा अशी झाली की, मी ख्रिस्ताच्या अगाध समृध्दीची सुवार्ता परराष्ट्रीयांना सांगावी...''[७८] पौल हे आनंदाने कबूल करितो की त्याची स्वतःची लायकी नसता केवळ देवाच्या सामर्थ्याच्या करणीने त्याचे जे कृपेचे दान त्याला देण्यात आले होते तेणेकरून तो त्या सुवार्तेचा सेवक झाला.

## गीतांव्दारे कृपेची महती

विश्वासणाऱ्यांवर परमेश्वर करत असलेल्या अपार असीम कृपेबद्दल कृतज्ञता दर्शविणारी अनेक ख्रिस्ती गीते आहेत. येथे दिलेल्या काही गीतांमध्ये परमेश्वराच्या कृपेच्या महतीचे वर्णन अत्यंत मनोवेधक पद्धातीने केले आहे.

जॉन न्युटन यांनी लिहिलेले 'अमेझिंग ग्रेस' हे गीत अजरामर तर झालेच पण सर्वतोमुखी सुद्धा आहे.

*अद्भुत कृपा, किती मधुर नाद*
*मज भ्रष्टा तारिले*
*हरवलेला मी, आता सापडलो*
*गेले अंधत्व, पाहतो.*

(लोक हे गीत आवडीने गात असले तरी त्यातील अनेकजण असा गैरसमज

बाळगून असतात की त्यांच्या जीवनातील चांगुलपणामुळे त्यांचे तारण होईल. हे एक गूढच आहे...)

आयझॅक वॉट्स आपल्या भावना खालील ओळीत मांडतात :

*अरेरे! माझ्या तारणाऱ्याने स्वरक्त ओतिले?*
*माझ्या तारणकर्त्याने स्वप्राण अर्पिले?*
*आणि त्याने आपला पवित्र देह ठेवला*
*तेहि मजसारख्या क्षुद्र प्राण्याकरिता? अरेरे!*

आपल्याला तारण केवळ कृपेव्दारेच लाभले हे जाणून चार्ल्स गॅब्रियल म्हणतात :

*प्रभु येशूच्या माझ्यावरिल प्रीतीने मी थक्क झालोय*
*त्याने आपणाहून सहज देऊ केलेल्या कृपेने मी गोंधळून गेलोय*
*त्याला माझ्यासाठी वधस्तंभावर खिळले होते*
*हे जाणून माझा थरकाप उडालाय*
*मज पाप्याकरिता –*

त्याने यातना भोगल्या, रक्त सांडले व स्वप्राणाचे बलिदान दिले.

जॉन वेस्ली यांना जेव्हा चार्ल्स सायमन पहिल्यांदा भेटले तेव्हा त्यांच्यात झालेल्या वस्तविक संभाषणाचा काही भाग खालील प्रमाणे...[७९]

*सायमन :* तुम्हांस आर्मिनियन म्हणतात हे मला ठाऊक आहे. (आर्मिनियन हा पंथ तारणाच्या बाबतीत मानवी इच्छास्वातंत्र्यावर जोर देतो.) मला पण कधी कधी कॅल्व्हिनीस्ट म्हटले जाते. (तारणाच्या बाबतीत देवाचे सार्वभौमत्व, अधिपत्य व निवड यावर जोर देणारा पंथ)[८०] या कारणामुळे खरे तर आपण एकमेकांवर शस्त्र उगारायला हवीत.

पण या व्दंव्दास सुरुवात करण्याची संमती देण्याआधी मी आपणांस काही प्रश्न विचारतो.
आपण नीतीभ्रष्ट तिरस्करणीय मनुष्य आहोत ही भावना तुमच्या मनात येते का? देवाकडे वळण्याचा विचार हा देवाने तुमच्या अंतःकरणात टाकल्याशिवाय आला ही नसता ही जाणीव तुम्हांस होते का?

*वेस्ली :* होय, खरोखर मला असेच वाटते.

*सायमन :* आणि तुम्ही स्वतः देवासमोर स्तुत्य असे काहीही करण्यास समर्थ नाही या जाणिवेने निराश होता का? तारणाची आशा आपण केवळ ख्रिस्ताच्या पवित्र बलिदानाव्दारेच बाळगू शकतो यावर आपले काय मत आहे?

*वेस्ली :* होय, केवळ ख्रिस्ताव्दारेच शक्य आहे. तोच एकमेव आणि अव्दित्तीय आहे.

*सायमन :* पण समजा तुमचे तारण आधीच ख्रिस्ताव्दारे झालेले आहे तर मग त्यानंतर तुम्ही स्वतःस राखण्यास समर्थ नाही का?

*वेस्ली :* कदापि नाही.

*सायमन :* माता जशी आपल्या नवजात बालकास कुशीत घेऊन सावरते, आधार देते तसेच प्रत्येक क्षणी, प्रत्येक घटकेस देवाच्या आधाराची तुम्हांस गरज आहे का?

*वेस्ली :* होय, सर्वस्वी.

*सायमन :* केवळ परमेश्वराची कृपा, दया तुम्हांला त्याच्या स्वर्गीय गौरवी राज्याकरिता अनंतकाळापर्यन्त राखून ठेवू शकेल हा तुमचा विश्वास आहे का?

*वेस्ली :* होय. माझा केवळ प्रभु परमेश्वरावरच भरवसा आहे.

जॉन वेस्ली यांच्या उत्तरांनी चार्ल्स सायमन यांचे समाधान झाले. निरनिराळ्या पंथाच्या विचारसरणींना ते दोघे जरी वैयक्तिकरित्या मानत होते तरी परमेश्वराच्या कृपेत, ख्रिस्तात ते नक्कीच एक होते. आपसातील समज-गैरसमज दूर झाले होते आणि आता व्दंव्दासाठी काही कारणच नव्हते. आपले 'शस्त्र' त्यांनी 'म्यान' केले.

हे दोन्ही पुरुष कृपेच्या भक्कम आधारे उभे होते.

## प्रकरण ८

# आपले बोलणेच आपला विश्वासघात करते

''मी सर्व उत्तमच करतोय'' असे जर कार्य–स्तरावर काम करणारे म्हणत आहेत तर असे म्हणून ते आपल्या पदाशी विश्वासघात करत आहेत. तुम्ही ज्यास उत्तम म्हणत आहात ते चांगले नाहीच! तुमच्या मते जे ''सर्वोत्तम'' आहे परमेश्वराच्या नजरेत ते अगदीच टाकाऊ निरुपयोगी आहे. ''इतर लोकांइतका मी वाईट नाही,'' हे जरी खरे असले तरी देवाच्या नजरेत आपण निर्दोष ही नाही व आपणांस तारणाची गरज आहे. ''मी ख्रिस्ती होण्याचा प्रयत्न करतोय. मी माझ्या शेजाऱ्यांशी दयेने वागतोय आणि मी चांगले जीवन जगतोय.'' फक्त प्रयत्न करुन ख्रिस्ती होता येत नाही. त्याकरिता प्रभु ख्रिस्तावर पूर्ण विश्वास ठेवून त्यास अनुसरणे गरजेचे आहे.

एच. स्मार्ट या प्राचीन गीतकाराने म्हटलेच आहेः

''सद्सव्दिवेकबुध्दि वा स्वप्नातीत सकलता, यापैकी काहीही नाही, जीवनातील माझ्या परमेश्वराची गरज व त्याच्याप्रती माझी आस एवढेच मला परमेश्वरायोग्य करिते.''

''मी प्रामाणिक असणे पुरेसे नाही का?'' एखादा मनुष्य प्रामाणिक असूनही त्याच्या हातून चूक घडू शकते. आता हीच घटना पाहा ना... एका मध्यरात्री बैठकीच्या खोलीतील आवाज संशयास्पद वाटून एक पिता जागा झाला. घरात चोर आहे या विचाराने लागलीच आपली बंदूक घेऊन त्याने त्या आकृतीवर गोळी झाडली आणि आपल्या प्रिय आपत्याचा बळी घेतला.

आपल्या कुटूंबाचे रक्षण करायचा त्याचा हेतू जरी प्रामाणिक होता तरी पण त्यांच्याकडून मोठी चूक झाली होती.

'मी तर अतिशय धार्मिक आहे.'' एखाद्या व्यक्तिचा धर्मच कधीकधी त्याच्याकरिता अत्यंत वाईट गोष्ट ठरते. कारण हा 'धर्मच' त्याला असलेली ख्रिस्ताची गरज जाणवू देत नाही. वॉरेन वीरस्बी म्हणतात, ''आजच्या काळातील 'धार्मिक' लोकांप्रमाणेच पौलामध्ये पुरेशी नैतिकता होती जी त्याला अडचणींपासून दूर राखत होती. पण त्याच्यामध्ये स्वर्गात जाण्याइतपत न्याय्यता वा सात्विकता नव्हती! वाईट गोष्टींनी नव्हे तर चांगल्या गोष्टींनीच पौलाला प्रभु येशू पासून दूर ठेवले. तारणाचा शोध घेण्याकरिता त्याला त्याचा 'धर्म' त्यागावा लागला.''[८१]

''मी आशा करितो की मी स्वर्गात जाईन.'' तुम्ही हे केवळ जाणलेच नाही तर पक्के लक्षात ठेवायला पाहिजे की फक्त आशा करणे पुरेसे नाही. कदाचित तुम्ही चुकीची आशा बाळगताय.

''माझे आजोबा सुवार्तिक होते.'' तारण ही अतिशय वैयक्तिक बाब आहे या सत्याकडे पाठ फिरविणारे वरिल विधान आहे. तुमच्या पूर्वजांची पुण्याई तुम्हांस कदापि तारणार नाही. कृपा किंवा तारण वंशपरंपरेने लाभत नाही.

''देव जोपर्यन्त मला मापीत नाही तोपर्यन्त कोणाला कसे समजणार?'' तुम्ही जर तुमच्या तथाकथित पुण्यकर्मांवर अवलंबून राहणार असाल तर न्यायसमयी फार उशीर झालेला असेल. पण आता या क्षणीहि आपणांस हे जाणून घेता येऊ शकते. परमेश्वराची अमूल्य देणगी म्हणजे प्रभु येशू ख्रिस्ताव्दारे सार्वकालिक जीवन लाभले आहे की नाही? ''मला वाटते मला चांगली संधी आहे.''

तारक प्रभु ख्रिस्ताऐवजी जर तुम्ही स्वतःवरच विसंबून राहिला तर निश्चितच तुम्हांला कोणतेही लाभाचे योग नाहीत.

''मी जर म्हटले माझे तारण झाले आहे तर तो केवळ माझा अंदाज

असेल,'' तारण जर काही कृत्यांमुळे मिळवता आले असते तर असे म्हणण्यात तथ्य होते. तारण कोणत्याही कृत्यांव्दारे नव्हे तर साध्या विश्वासामुळे आधारित लाभणारी विनामुल्य देणगी आहे. आणि हा अंदाज नाही, तर सत्य आहे. परमेश्वर म्हणतो जे कोणी पश्चात्ताप करतात व विश्वासपूर्वक त्यास समर्पित होतात त्यांना तारण प्राप्त होते. परमेश्वराच्या अभिवचनाला आपण अंदाज वा तर्क म्हणू शकतो का? छे, कदापि नाही कारण परमेश्वराच्या शब्दाविषयी संशय घेणे हे अनुमानच न पटणारे आहे.

''मला माझे जीवन आधी शुध्द करावे लागेल ना?'' मुळीच नाही. परमेश्वर तुम्हांला तुम्ही तुमच्या पापांत आहा तसे बोलावित आहे. तुम्ही जर स्वतःला नीट करायची वाट पाहाल तर मग तुमचे देवाकडे येणे कधीच होणार नाही. परमेश्वर सज्जनांच्या किंवा जे स्वतःला शुध्द करण्याच्या प्रयत्नात आहे अशा लोकांच्या शोधात नाही. परमेश्वर पातक्यांच्या शोधात आहे. ज्यांना तो तारण व सार्वकालिक जीवन प्रदान करू शकेल.

''माझा निभाव लागणार नाही याची मला भीति वाटते.'' तुमच्यातून ही भीति पूर्णपणे नाहिशी होईल जेव्हा तुम्ही जाणाल की तारण म्हणजे केवळ कृपा आहे. त्यामुळे स्वतःचा बचाव करून तरणे वा निभाव लागणे या गोष्टी येथेच निकाली लागतात. लक्षात ठेवणे हे गरजेचे आहे की जो अद्भुत तारक तुम्हांस तारणाची अनमोल देणगी विनामोबदला देतोय तो आपला उध्दारक प्रभु ख्रिस्त ''तुम्हांस पतनापासून राखण्यास आणि आपल्या ऐवश्र्ययुक्त सान्निध्यात निर्दोष असे उल्लासाने उभे करण्यास समर्थ आहे.''[८२]

वरील सर्व वाक्यांमध्ये आढळणाऱ्या 'मी' पणाच्या अट्टाहासाकडे लक्ष द्या. तारणकर्त्याचा तेथे एका शब्दानेही उल्लेख नाही. मी कोण वा कसा आहे किंवा मी काय केले यावरच सर्व अवलंबून आहे – पाहा मनुष्याचे विचार!

प्रकरण ९

# कार्यातील उणीवा

''कर्मांवर आमचा विश्वास नाही असा आपला गैरसमज होण्याची शक्यता आहे.

कर्मांव्दारे आपले तारण होत नाही असे जेव्हा आम्ही म्हणतो तेव्हा आमचा रोख तथाकथित पुण्यकर्म वा सत्कर्म याकडे असतो. असे कोणतेही कर्म नाही ज्याव्दारे आपण उपकारबध्द करुन स्वर्गातील आपल्या स्थानावर दावा करू शकता.

तसे पाहता, पश्चात्ताप आणि विश्वास ही कर्म आहेत पण ती तशी 'पुण्यकर्म' नाहीत. पश्चाताप म्हणजे पापांकडे पाठ करून देवाला सामोरे जाणे. विश्वास म्हणजे देवाच्या वचनांचा पूर्णपणे स्वीकार करणे. पश्चात्ताप किंवा विश्वास यापैकी कोणत्याही गोष्टीविषयी कोणी बढाई मारणे योग्य नाही कारण या कृती सर्वांनीच आपल्या आचरणात आणणे हे आवश्यक आहे.

एखाद्या पातक्याला जर सत्कृत्य करायचे असेल तर त्याने प्रभु ख्रिस्तावर विश्वास ठेवावा. प्रभु येशू ख्रिस्ताला यहुद्यांनी जेव्हा विचारले,'' देवाची कामे आमच्या हातून व्हावी म्हणून आम्ही काय करावे? येशूने त्यांना उत्तर दिले, ''देवाचे काम हेच आहे की ज्याला त्याने पाठविले त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा.''[८३]

म्हणूनच प्रभु येशूने सांगितलेल्या या कार्याखेरिज केलेली इतर कार्ये देवाच्या नजरेत निष्फळ व निरुपयोगी ठरतात. आमची सर्व धर्मकृत्ये घाणेरड्या वस्त्रांसारखी होतात.[८४] पण मनुष्याच्या नवीन जन्मासह सर्व

परिस्थिती पालटते. अशावेळी देववचनांचे आज्ञापालन करुन केलेले कोणतेही कार्य चांगलेच ठरते. मनुष्य मग जे काही करतो ते देवाच्या पसंतीस पात्र ठरते. परमेश्वराला संतोषविण्यासाठी केलेली अगदी सामान्य किरकोळ कार्ये ही चांगली होतात. पुष्कळदा आपण आपली चांगली कामे दया, दान–धर्म या पुरतीच मर्यादित ठेवतो. पण आपली नेहमीची कर्तव्ये जी आपण कार्यालयात व घरी पार पाडतो त्यांची दखल ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर घेतली जाणार आहे.

चांगली कामे किंवा सत्कृत्ये ही तारणाची फळे आहेत, मूळ नव्हे; कारण नव्हे तर परिणाम आहे. विश्वासणाऱ्याने चांगली कामे करावी ही शिकवण पवित्रशास्त्रात ठिकठिकाणी आढळते,[८५] विश्वासणाऱ्याने ही चांगली कामे तारणाकरिता नव्हे तर तारण झाले आहे म्हणून करावी. सत्कृत्यांमुळे आपले तारण झालेले नाही तर आपले तारण झाले आहे म्हणून आपण सत्कृत्ये करावी. यामुळे आपल्या तारणावर शिक्कामोर्तब होतो.

जे देवाने जोडले आहे ते आपण वेगळे करू नये. विश्वास व तारण, काम व इनाम (सन्मान) हे त्याने जोडले आहे. या जोड्या लक्षात ठेवा आणि पाहा सर्व कसे उत्तम होईल!

प्रकरण १०

# या प्रश्नाचे उत्तर द्या

## तुम्ही जर पाप केले तर तुमच्या तारणापासून वंचित व्हाल का?

''एखाद्या विश्वासणाऱ्याने पाप केल्यावर तो तारणाला मुकणार नाही का? सतत उद्‌भवणाऱ्या या प्रश्नाचे उत्तर आहे – खचितच नाही. पाहा : प्रभु येशू म्हणाला की त्याच्या मेंढरांचा कधीही नाश होणार नाही.[८६] या वादावर पडदा टाकण्यासाठी हे अभिवचन पुरेसे आहे.

तारण ही कृपेव्दारे लाभलेली देणगी आहे. परमेश्वर जेव्हा देणगी देतो ती तो परत हिरावून घेत नाही,[८७]
आणि ज्या महादयेनुसार आपण रक्षिले जातो ती ही राखली गेली आहे.[८८] सार्वकालिक जीवन हे देवाचे कृपादान आहे.[८९] सार्वकालिक म्हणजे अनंतकाळाकरिता.

जेव्हा एखाद्या व्यक्तिचे तारण होते तेव्हा त्या व्यक्तिचा नवीन जन्म होऊन ती देवाच्या लेकरांपैकी एक होते.[९०] आणि जेव्हा जन्माची क्रिया घडते तेव्हा त्या क्रियेत काही बदल होत नाही, ना ती क्रिया रद्द होते. ती नेहमी करिता असते. नातेसंबंध हे न तुटणाऱ्या मजबूत साखळदंडासारखे आहेत.

आगाऊ नेमलेल्यांना पाचारण होते व देव या नीतिमांनाचा गौरवहि करतो.[९१]

स्वर्गीय पित्याव्दारे लाभलेला पवित्र आत्मा विश्वासणाऱ्यासह सदैव

राहतो.[९२] ती व्यक्ती पापविरहित आहे तोपर्यन्तच असे नाही. परमेश्वराने विश्वासणाऱ्या ख्रिस्तीजनांना पवित्र आत्मा विसार म्हणून दिला आहे.[९३] आणि ही अनंत गौरवाची शाश्वती आहे.

विश्वासणाऱ्यांवर पवित्र आत्म्याचा शिक्का मारून, परमेश्वराने या ख्रिस्तजनांना मुक्तीच्या दिवसापर्यंन्त खंडणी भरून व मुद्रित करून आपलेसे करून घेतले आहे.[९४]

आपण शत्रु असता प्रभु येशू ख्रिस्ताने तुम्हा-आम्हां सर्वांचा देवाबरोबर समेट घडवून आणला आहे. तर आता समेट झालेला असता प्रभु त्याच्या सेवेकरीत गौरवी राज्यात आपल्याला किती विशेष रितीने राखून ठेवेल.[९५] आपला नाश होऊ नये याकरिता प्रभुने फार मोठी किंमत मोजली आहे.

विश्वासणारा मरणांतून जीवनात पार जातो व त्याला सार्वकालिक जीवन प्रात होते. त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येत नाही.[९६] परमेश्वर आता त्याचा पिता आहे, त्याचा न्याधीश नाही.

तुमच्या आमच्या पापांकरिता ख्रिस्त मरण पावला.[९७] त्याने आमच्याकरिता खंडणी भरली आहे जेणेकरून आम्हां सर्वांना कृपा लाभावी. आपल्या सर्वांचा पातकभार हलका करून ही खंडणी त्याने एकदाच पण नेहमीकरिता सर्वांसाठी भरली आहे.

प्रभु येशू ख्रिस्ताचे कार्य पूर्ण झाले आहे.[९८] पूर्ण झालेल्या प्रभुच्या कार्यात आपण काही करावे किंवा आपणाला यात काही भर टाकता येईल असे नाही.

ख्रिस्त येशू आपला प्रभु ह्याच्यामध्ये देवाची आपल्या विश्वासणाऱ्यावरिल जी प्रीति आहे तिच्यापासून विभक्त करायला विश्वात वा कोठेही अशी कोणतीच गोष्ट समर्थ नाही.[९९]

हे पण खरे आहे की पवित्रशास्त्रातील काही वचनांमध्ये असा उल्लेख आहे की एखाद्या व्यक्तिस तारण लाभते पण मग त्याच्या किंवा

तिच्या पातकांमुळे ती व्यक्ती त्यास पुन्हा मुकते. यातील बहुतांश वचने सर्वसाधारण ख्रिस्तीजनांविषयी आहेत. जे नवीन जन्म पावलेले विश्वासणारे आहेत त्यांच्याविषयी नाही. काही शास्त्रपाठांमध्ये हा उल्लेघ तारणाविषयी नसून सेवेसंदर्भात आहे. काही शास्त्रपाठ पतित धर्मभ्रष्टांचे वर्णन करतात – हे लोक ख्रिस्तावरिल विश्वासाबद्दल उघडपणे 'बोलतात' पण काही काळानंतर ते ख्रिस्तालाच त्यागतात. यावरून हेच सिध्द होते की त्यांचा पालट कधी झालाच नव्हता.

## होय, पण जर विश्वासणाऱ्याकडून पातक घडले तर?

विश्वासणाऱ्याने पाप केले तर मग काय होते? तर मग त्याची देवासह असलेली सहभागिता संपुष्टात येते.[१००] देव त्याचा अनंतकालिक पिता[१०१] असला तरी त्याच्याबरोबर असलेल्या सुमधुर संबंधामध्ये वितुष्ट येऊन सहभागिता पण भंग पावते.[१०२] तो उध्दाराच्या आनंदाला मुकतो.[१०३] तो आपले सामर्थ्य गमावतो.[१०४]
तो प्रभावी साक्षीला मुकतो.[१०५] त्याचे मुख उघडत नाही. प्रभुच्या अपार दयेमुळे तो स्वर्गात जाण्यास पात्र ठरत असला तरी पृथ्वीवरिल सेवेकरिता तो अपात्र ठरतो.

त्याने केलेले पातक सर्वांसमोर उघडकीस येता तो प्रभुच्या नावास लज्जा आणतो आणि परमेश्वराच्या शत्रुंस उपहास व ईश्वरनिंदा करावयास निमित्त देतो.[१०६]

तो असत्यामध्ये जगतो. त्याच्या या अनितीच्या कृतींमुळे त्याचे जीवन, त्यात तो दाखवत असलेला पालट सर्वच शंकास्पद ठरते.[१०७] त्याच्या जीवनात ताळमेळ राहात नाही. तो जरी उच्च कोटीचे बोलत असला तरी त्याची कृती अत्यंत हलक्या प्रतीची व हीन असते. त्याच्या दुष्कर्मांमुळे त्याच्या प्रार्थना प्रभुपर्यन्त पोहंचत नाहीत.[१०८] त्याचे सर्व काम राखेसारखे होऊन नाहीसे होते. त्याचे अतीव नुकसान होते.[१०९] त्याच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात.[११०]

जीवनाचा नाश स्वतः ओढवून घ्यायचा धोका त्याच्याकडून संभवतो.[१११] साध्या एका निर्णयामुळे हा आपल्या उर्वरित आयुष्यात प्रभुपासून व प्रभुसेवेपासून दुरावला जाऊ शकतो. या पृथ्वीवरिल जीवनाला तो मुकू शकतो.[११२]

ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर जे बहुमान त्याला लाभणार होते त्यांस ही तो मुकतो.[११३]

अशा परिस्थिती मध्ये सर्व नैराश्यमय असले तरी पुन्हा देवाकडे जाण्याची संधी आहे, पातकांपासून मागे फिरण्याचा मार्ग आहे. जो कोणी आपले पाप–दोष कबूल करून सोडून देतो,[११४] पिता परमेश्वर त्याला क्षमा करतो. पहिले योहान १:९ मध्ये यावरच अगदी ठासून सांगितले आहे. ''जर आपण आपली पापें पदरी घेतली तर तो विश्वसनीय न न्यायी आहे. म्हणून आपल्या पापांची क्षमा करील व आपल्याला सर्व अनीतीपासून शुध्द करील.'' पातकात पडलेल्या विश्वासणाऱ्यांची जबाबदारी हीच की त्याने आपली सर्व पातके देवासमोर कबूल करावी. जर त्याने आपले सर्व दोष कबूल केले तर दयेची याचना करत शोकात खितपत पडून राहण्याची गरज भासणार नाही, भले ते प्रसंगोचित असले तरीही... त्याने फक्त खऱ्या अंतःकरणाने आपली एकूणएक सर्व पातके, दोष देवासमोर कबूल करून सोडून दिले पाहिजेत.

परमेश्वर आपला देवपिता विश्वसनीय, न्यायी व क्षमाशील आहे. त्याने आम्हांस पापक्षमेचे अभिवचन दिले असून प्रभु येशू ख्रिस्ताने आम्हांसाठी केलेल्या रदबदलीमुळे तो आम्हांस न्याय्य क्षमा प्रदान करतो.

तो आपल्याला केवळ क्षमाच करीत नाही तर सर्व अमंगळपणापासून शुध्दही करतो. आमचे सर्व दोष दूर करतो. आमच्या मनातील अपराधाची दोष भावना दूर करतो.

तारण न पावलेला मनुष्य जेव्हा प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून पश्चात्ताप करतो तेव्हा त्यास त्याच्या पापांकरिता न्यायाधिकारयुक्त क्षमा मिळते.

जेव्हा एखादा ख्रिस्ती विश्वासणारा आपले दोष कबूल करतो तेव्हा त्याला त्याच्या स्वर्गीय पित्याकडून प्रीतीपूर्ण क्षमा लाभते.

एक सावधानतेचा इशारा येथे जोडणे अत्यंत आवश्यक आहे. विश्वासणाऱ्याने खऱ्या अंतःकरणाने आपले दोष कबूल करून क्षमा मिळवली तरी त्या पातकांचे परिणाम राहतातच. याचाच अर्थ हा आहे की पाप करून कोणीही निस्टून जाऊ शकत नाही.

**<u>एकाचे तारण होऊन तो पुन्हा भरकटला.... त्याचे काय?</u>**

आपल्या मनात आलेला हा विचार मी समजू शकतो. एखादा ख्रिस्ती व्यक्ती पापांत पडून तारणाला मुकला तर त्याचे पुढे काय? सर्व प्रथम वस्तुस्थिती काय आहे ते जाणून घेणे गरजेचे आहे. महत्त्वाचे म्हणजे स्वतःला ख्रिस्ती म्हणवून घेणारे व ज्यांचा खरोखरी पालट होऊन नवीन जन्म झाला आहे या दोन्ही लोकांमध्ये मोठा फरक आहे. जसे एखादा मनुष्य स्वतःचे तारण झाले आहे असे म्हणतो पण त्याच्या पुर्वीच्याच पापमय आयुष्यात जगतो तर तो स्वतःच आपले सोंग (थोतांड) उघड करतो. कोणी प्रभु ख्रिस्ताला शरण जाऊन जर त्याला स्वतःच्या आयुष्यात प्रथम स्थान देतो तेव्हा त्याच्या जीवनात होणारा बदल लक्षवेधी ठरतो.

सन्मार्गापासून बहकणारे पण काही जण असतात. अशांचा पालट झाला तरी कालांतराने ते मोहापायी प्रभु पासून दुरावतात. पेत्राचे उदाहरण पाहा. त्याने ख्रिस्तावर खरी प्रीति केली पण तो ही बहकला. अशांना देव एक तर शिस्त लावून जीवनात पुन्हा संधी देतो किंवा येथून वर नेतो.

त्याचप्रमाणे पतित धर्मभ्रष्टांचाही एक प्रकार असतो. पवित्रशास्त्रातील उदाहरण घ्यायचे झाले तर यहूदा इस्कार्योत. आजच्या काळात असे अनेक जण सापडतात. ते विश्वासात असल्याचे ढोंग करतात पण त्यांचा नवीन जन्म झालेला नसतो. काहीजण तर सर्रास बाप्तिस्मा घेऊन स्थानिक मंडळीचे सदस्यत्व व इतर महत्त्वाची पदे भूषवितात. पण हे ख्रिस्तव्देष्टे व ख्रिस्ती सत्याला न जुमानणारे असतात. अशांमध्ये बदल घडणे महाकठीण

असते. या सर्व बाबींमध्ये आपण आपले धर्माचे तत्व व शिकवण अनुभव किंवा भावनेआधारे मांडणे योग्य नाही. कसोटी हीच – ''पवित्रशास्त्र काय सांगते?'' पवित्रशास्त्र हेच सांगते की खरा विश्वासणारा अनंतकाळासाठी तारला जातो. हे म्हणजे अगदीच सोपे! तारण म्हणजे विनामूल्य मिळणारी देणगी असा समज करून घेणे रास्त नाही. आपले शुभवर्तमान अतिशय अल्पमोलाचे आहे असे तुम्हांला वाटत आहे काय?

पवित्रशास्त्रातून या प्रश्नाचे उत्तर द्यायचे झाल्यास हे लक्षात येते की हे शुभवर्तमान आपल्याला विनासायास जरी लाभत असले तरी आपल्या तारणाऱ्या प्रभुला त्याकरिता सर्वस्व अर्पावे लागले. तुमच्या–माझ्या उध्दाराकरिता त्याने स्वतःचे प्राण वधस्तंभावर अर्पूण आपल्यासाठी त्याने रक्ताची खंडणी भरली तर मग हे अल्पमोलाचे कसे होऊ शकते? उध्दाराच्या, तारणाच्या देणगीचे स्वरुपच असे होते की मोल (खंडणी) देणगी देणाऱ्याला सर्वस्व (स्वप्राण) अर्पूण द्यावी लागली.

जन्मदिवस, लग्न, सणवार या प्रसंगी जर आपण कोणतीही भेटवस्तू वा देणगी नाकारित नाही तर ही सर्वात महान देणगी आपण का बरे नाकारावी?

'अल्पमोलाची वा मोफत' मिळालेल्या गोष्टींचे मनुष्याला फारसे मोल नसते. त्यात त्याचा अहंकार ही आडवा येतो. स्वर्गात प्रवेश मिळविण्याकरिता मी किती परिश्रम केले, किती पुण्यकर्म केले, पुण्य रचले या वेडगळ कल्पनांमध्ये त्याला रममाण होऊन स्वतःचा अहंभाव कुरवाळायचा असतो. पण तारण हे केवळ परमेश्वराच्या कृपेने लाभणारी देणगी आहे. यामुळे या लोकांना हवा तसा मनोविलास करता येत नाही म्हणूनच ही देणगी त्यांना रुचत नाही व ते ही देणगी नाकारतात.

प्रकरण ११

# कृपेचा दुरुपयोग

इतर उपयुक्त उत्तम गोष्टींप्रमाणेच कृपेचाही दुरुपयोग होऊ शकतो. अग्नि व जल या गोष्टी मानवजातीकरिता मोठे वरदान असल्यातरी आपल्या गाफीलपणामुळे यांचा गैरवापर दुरुपयोग होतोच. दैववाद मांडताना लोक परमेश्वराच्या सार्वभौमत्वाचा विपर्यास करतात. जे होणार आहे ते होईलच आणि त्याविषयी आपण काहीच करु शकत नाही असे म्हणतात. निवडीच्या स्वातंत्र्याविषयी सांगताना सुर्वाता म्हणजे परिश्रम व वेळ या दोहोंचा अपव्यय असे ही धूर्तपणे मांडले जाते.

खेदाची गोष्ट ही की, निष्काळजी उच्छृंखल जीवन जगण्याकरिता देवाच्या कृपेचा अनेकजण दुरुपयोग करतात. लाभलेल्या स्वातंत्र्याचा जीवनात उपयोग करुन विश्वासणारा काहीही करु शकतो पण याचा अर्थ हा नव्हे की धर्मतत्वांमध्ये काही दोष आहे. याचा अर्थ हाच कही काही लोक स्वतःच्या अविवेकी वागणुकीचे समर्थन द्यायला एवढी तत्परता दाखवतात की अविचारीपणाने ते शास्त्राचा आधार द्यायलाही मागेपुढे पाहात नाहीत. त्यांना फक्त आपली सोय बघायची असते.

खरे पाहता, विश्वासणारे हे नियमशास्त्राधीन नव्हे तर देवाच्या कृपेअधीन आहेत.[११५] पण याचा अर्थ असा होत नाही की नियमांचे उल्लंघन करायची त्यांना मुभा आहे! ते नियमशास्त्रातील दंडाज्ञांच्या अधीन नसले तरी ते ख्रिस्ताच्या नियमाच्या अधीन आहेत.[११६] म्हणजेच ते प्रीतीने ख्रिस्ताशी जोडले गेले असून प्रभुला प्रिय अशाच गोष्टी करण्यास बांधील आहेत.

*शास्त्रनियमांनी मजला का बांधावे?*
*हृदय जे माझे जडले तुजशी*
*राहिल आनंदी तुझ्या अधीनच...*

म्हणूनच जर प्रभु ख्रिस्त एखाद्या मनुष्यास बंधमुक्त करतो तेव्हाच तो खराखुरा बंधमुक्त होईल.[११७] बंधमुक्त असणे म्हणजे कसेहि वागण्याचे, पाप करण्याचे स्वातंत्र्य नव्हे! वैमानिक आपले विमान उडविताना संपूर्ण आकाशाला गवसणी घालू शकतो पण गंतव्य स्थानी सुरक्षित पोहंचण्यासाठी त्याने त्यास नेमून दिलेला मार्गच पाळला पाहिजे. गलतीकरांना (व सर्व विश्वासणाऱ्यांना) पौलाने हीच शिकवण दिली आहे की, ''बंधुजनहो, तुम्हांला स्वतंत्रतेकरिता पाचारण झाले; तरी त्या स्वतंत्रतेने देहवासनांना वाव मिळू देऊ नका.''[११८]

जॉन मॅकॉर्थर म्हणतात : नियमांपासून स्वातंत्र्य म्हणजे पापांच्या बंधनातून व दंडाज्ञेपासून स्वातंत्र्य होय, नैतिक मर्यादांचे उल्लंघन करण्याचे स्वातंत्र्य नव्हे. कृपा ही आपल्याला मन मानेल तसे वागण्याची मुभा नव्हे तर देवास संतोषविण्याचे आपल्याला लाभलेले सामर्थ्य आहे. कृपेचा हेतू जर पापांपासून आपली मुक्तता आहे तर याच कृपेचा दुरुपयोग करून पापांकडे पुन्हा वळणे किंवा मोहाचा विचारही करणे गैर आहे? कृपादान लाभलेले पापात कसे रमणार?[११९]

कृपेची ढाल पुढे करून काही लोक बेपर्वाईने कसे काय अविचारी जीवन जगू शकतात? याचा अर्थ हाच की त्यांच्यात बदल असा झाला नव्हता. असेही काही धार्मिक ख्रिस्ती आहेत जे इतर उत्सवांची मजा लुटत दुराचाराचा अतिरेक करतात आणि राखेच्या बुधवारी पापकबुली देऊन क्षमा मिळवण्याची योजना आखतात. हेच महाभाग उपासकाळात या सर्व गोष्टींपासून दूर राहण्याचा संकल्प पण सोडतात.

कृपेचे खरे तत्व इतरांनाच नव्हे तर विश्वासणाऱ्यांही पूर्ण माहिती असण्याची शक्यता पण कमीच आहे. देवाच्या पवित्रतेविषयी त्यांना सत्य

उमगलेच नाही असेहि असू शकते तथापि पुरेसे शिक्षण वा उपदेश न मिळताहि देवाच्या योजनेमुळे एखाद्या व्यक्तिस तारण लाभू शकते.

काही जण या बाबींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात . त्यांच्याकडून काय अपेक्षित आहे हे त्यांना ठाऊक असून सुध्दा ते देवाची समक्षता अव्हेरतात आणि यामुळेच ते देवाच्या सहभागितेत नाहीत. ते बहकलेल्या स्थितीत आहेत हे त्यांना माहित असून सुध्दा ते हा गोड गैरसमज बाळगतात की देव त्यांच्या या छोट्या चुकांकडे दुर्लक्ष करेल. त्यांच्यामते ते क्षम्य अपराध आहेत.

असे लोक पतित धर्मभ्रष्ट असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा अविश्वासणाऱ्यांचे वर्णन यहूदा (इस्कर्योत नव्हे!) आपल्याला पत्रात खालील प्रकारे करतोः

''अभक्तीने वागणारी माणसे आपल्या देवाच्या कृपेचा विपर्यास करून तिला कामातूरपणाचे स्वरूप आणतात. आणि आपला एकच स्वामी व प्रभु येशू ख्रिस्त ह्याला ते नाकारतात.[१२०]

प्रकरण १२

# देव पावित्र्य कसे निर्माण करतो?

आपण पाहिले की तारण कोणत्या कार्यामुळे (कृत्य वा कर्म इ.) नव्हे तर विश्वासाने लाभलेल्या कृपेव्दारे होते. पण नंतर प्रश्न हा पडतो, ''ज्यांना तारण लाभले आहे ते जीवनात पावित्र्य कसे संपादितात?'' जेव्हा एखादि व्यक्ती ख्रिस्ती होते तेव्हा निश्चितच जीवनात बदल होतो. मग पुढचा प्रश्न हा आहे की कोणत्या प्रक्रीयेमुळे हा पालट घडून येतो?''

प्रत्यक्षात : त्याकरिता फक्त दोन प्रतिपादीत मार्ग आहेत. नियमानुसार अथवा कृपेव्दारे. या दोन मार्गांना समोर ठेवून लोक जसे स्वर्ग प्राप्तिची आशा करतात तसेच याच मार्गांनी ते जीवनात पावित्र्य आणण्याकरिता त्यांचा अवलंब करू पाहतात.

लोकांना नियमांच्या अधीन करणे हा सर्वांत स्वाभाविक आणि मानवी स्वभावास अनुरुप समजला जाणारा मार्ग आहे. लोकांना त्यांनी काय करावे आणि करू नये यासारख्या नियमावलींचे संच देऊन सांगा की सर्व पणाला लावून त्यांनी यांचे पालन करायलाच हवे. आणि नियमांबरोबर धाकासाठी शिक्षा हवीच ना? तर मग त्यांना हे पण कळू द्या की जर त्यांनी नियमांचे पालन केले नाही तर मग ते त्यांच्या तारणाला मुकतील. पावित्र्ययुक्त जीवनाकरिता हे किती रास्त व तर्कसंगत वाटते ना? असा धाक नसता तर लोक मोकाट सुटून स्वैराचारात डूंबतील. सबब हीच आहे.

पण समस्या ही आहे की नियमपालन म्हणजे पावित्र्य साध्य

करण्याचा महामार्ग नव्हे. ना कोणास स्वसामर्थ्याने पावित्र्यपूर्ण जीवन जगता येते ना कोणी स्वतःच तारण मिळवण्याइतपत समर्थ आहे. गलतीकरांस जेव्हा पौलाने प्रश्न केला तेव्हा त्याला हेच म्हणायचे होते, ''तुम्ही इतके बुध्दिहीन आहां काय? तुम्ही आत्म्याने प्रारंभ केल्यावर आता देहस्वभावाने पुर्णत्व मिळवू पाहत आहा काय?''[१२१] लोकांनी काय करावे? नियमशास्त्र एवढेच सांगते. पण ते करण्यासाठी सामर्थ्य पुरवित नाही उलट नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांस दंडाज्ञा देते. पावित्र्याकडे नेण्याऐवजी नियमशास्त्र अगदी विरुध्द परिणाम साधते. व्यक्तिस जेव्हा एखादी गोष्ट करण्यास मनाई केली जाते तेव्हा तीच गोष्ट करण्याचा तीव्र मोह होतो तसेच हे आहे. नियमशास्त्रातून पावित्र्याची निर्मिती कधीच होत नाही. ते केवळ पातक्यांचे दोष उघड करून त्यांना दंडित करते.

देव कृपेच्या पध्दतीने पावित्र्य निर्माण करतो. परिणामस्वरूप तो म्हणतो, ''पाहा, मी माझ्या कृपेने तुमचे तारण केले आहे. आता तारणाऱ्याच्या प्रीतीने प्रेरित होऊन बाहेर पडा व आपल्या वृत्तीशी सुसंगत असे जीवन जगा.'' पाहा, कृपेतील प्रीति हीच पावित्र्यपूर्ण जीवनाला प्रेरित करते. आणि भयापेक्षा प्रीति ही निश्चितच उच्च व श्रेष्ठ प्रेरणाभाव आहे. शिक्षेचे भय लोकांकडून जे कार्य साध्य करून घेऊ शकत नाही तेच कार्य लोक अगदी सहजपणे केवळ प्रीतीस्तव पार पाडतात. भयामुळे कदापि नाही पण देवाकरिता असलेल्या प्रीतीस्तव जीवनात पावित्र्य निर्माण होऊ शकते.

ख्रिस्ताच्या कार्यामुळे कृपेव्दारेच विश्वासणारा देवास सामोरा जाऊ शकतो. कृपेमुळेच विश्वासणारा आपल्या या स्थानाला सार्थ असे जीवन सरावाने जगू शकतो. ज्याची गणना देवाच्या लेकरात होणार आहे त्याने आपला डौल राजेशाही ठेवला पाहिजे. जे.एफ.स्ट्रॅम्बेक म्हणतात, '' देवाने कृपेव्दारे आपल्याकरिता काय केले याची आठवण तो प्रथम करून देतो आणि मग त्याच्या आधारे आपण सुसंगत जीवन जगावे याचे आवाहन करतो.''[१२२]

जे ख्रिस्तामध्ये आहे तेच स्थान देवाच्या लेकरांचे देवामध्येही आहे. देवासमोरचे स्थान समजण्याकरिता 'ख्रिस्तामध्ये' हा शब्द उपयुक्त ठरतो. देव या विश्वासणाऱ्यास 'ख्रिस्तामध्ये' पाहतो कारण त्याने ख्रिस्तास तारणारा उध्दारक म्हणून स्वीकारले आहे. विश्वासणाऱ्याने प्रभु ख्रिस्ताचा अंगिकार केला म्हणूनच तो देवाला पण प्रिय असा आहे. त्याच्या दैनंदिन जीवनात 'ख्रिस्तामध्ये' जगण्याचा सराव आहे. कृतिशील विश्वास तो हा जो आपण रोज ख्रिस्तामध्ये जगून सराव करतो.

अनेकदा विश्वासणाऱ्याच्या जीवनात त्यांचे देवासमोर (ख्रिस्तामध्ये असल्यामुळे) असलेल्या स्थानाशी सुसंगत असे काही आढळत नाही. पण निदान त्यांनी देवास संतोषविणारे, त्याच्या पावित्र्यास गौरव देणारे व त्याच्या 'ख्रिस्तामध्ये' असलेल्या स्थानास साजेसे असे जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ख्रिस्त जेव्हा आपल्या विश्वासणाऱ्यास गौरवात घेईल तेव्हा निश्चितच स्वर्गी त्याला विश्वासाचे फळ मिळेल पण देवाला संतोषविणारे जीवन जगून त्यात प्रगती केली, पावित्र्यात वाढलो तर त्यातून निश्चितच देवाचा गौरव होईल.

देवासमोर असलेल्या विश्वासणाऱ्याच्या स्थानाचे व त्याच्या स्थितीचे वर्णन या विशेषणांव्दारे करता येईल : नवीन जन्म घेतलेला, आध्यात्मिक उन्नत्ति केलेली, स्वीकार झालेला, संपूर्ण, दोषहीन, पाप मुक्त झालेला, पवित्र गौरव लाभलेला...

विश्वासणाऱ्याचे आचरण, वर्तन, जीवनात पवित्रता सरावाने आणण्याचे वर्णन या क्रियापदांच्या आधारे करता येईल. असणे, करणे, घडणे, चालणे, देणे, गणणे, टिकणे, अडवणे, सोडणे, टाकणे, भरणे, पार पाडणे, उपजणे...

ख्रिस्तामध्ये असलेल्या विश्वासणाऱ्यांस देव गौरवी स्थान प्रदान करतो व त्या स्थानास साजेल असे आचरण करायला शिकवतो व बळ देतो. नियमशास्त्राचे स्वरुप निराळेच नव्हे तर एकदम विरुध्द आहे. ते

म्हणते, ''आपले स्थान मिळवण्यासाठी तुम्हांला झटून श्रम करणे गरजेचे आहे'' किती अशक्य आणि असाध्य गोष्ट आहे. पण कृपा काय म्हणते ते पाहा, ''देवासमीप स्थान मी तुम्हांला विनामुल्य देणगी म्हणून देत आहे तर आता त्या स्थानाला साजेल असे तुम्ही आचरण करा.'' हे केवळ आपल्यात वसणाऱ्या अधिष्ठित पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याव्दारेच घडू शकते.

एक घटना येथे उदाहरणादाखल द्यावीशी वाटते. एका शिस्त प्रिय कुटूंब प्रमुखाने पत्नीच्या निधनानंतर आपल्या घराकडे व मुलांवर लक्ष ठेवून त्यांची काळजी वाहण्यासाठी एक आया ठेवली. त्याने तिची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व पाळावयाचे नियम याची एका कागदावर यादी करून घरात लावली. ती आया नियमाप्रमाणे आपली सर्व कामे करत होती. काही काळानंतर त्याचे त्या स्त्रीवर मन जडते. ती पण त्याच्या प्रेमाला प्रतिसाद देते व ते दोघे एकमेकांशी विवाहबध्द होतात. विवाह होताच तो यादी काढून टाकतो, ती आपली सर्व कामे आधीच्याच तत्परतेने किंबहुना पूर्वीपेक्षा अधिक उत्तमरित्या पार पाडत असते. पूर्वी ती नियमाला धरून नोकरी टिकवण्याच्या दृष्टिने काम करत होती पण आता ती सर्व फक्त प्रेमापोटी करत आहे.

व्यवस्थित विचार केल्यास आपल्यालाही उमजेल की पावित्र्यपूर्ण जीवन जगण्यासाठी प्रवृत्त करणारी महत्त्वाची गोष्ट कृपेशिवाय दुसरी कोणतीही असू शकत नाही.

प्रभु येशू ख्रिस्ताने स्वतःचा प्राण अर्पण करून आम्हांसर्वांना तारणाचा मार्ग मोकळा केला. आम्हांसर्वांची पातके त्याने स्वतःच्या शिरी घेतली. जे आपले पाप त्याच्या मृत्युस कारणीभूत ठरले त्या पापात आपण पुन्हा पडून त्याचे प्राणार्पण, बलिदान आपल्याला व्यर्थ ठरवायचे आहे काय?

जर ख्रिस्ताने आपला प्रिय मित्र असल्याचे सिध्द करून दाखवले

आहे तर आपणहि आपल्या वागण्याबोलण्यातून त्यास संतोषवावे हे एकमेव उद्दिष्ट्य ठेवून त्याप्रमाणे करणे योग्य नाही का?

प्रभु येशू ख्रिस्त आम्हां विश्वाणाऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून मरण पावला. म्हणूनच जेव्हा तो मरण पावला तेव्हा आम्हीही पापांकरिता नेहमीसाठी मरण पावलो. हेच लक्षात ठेवून आपण पापविरहित जीवन जगले पाहिजे. रोम. ६ मध्ये पौल हाच मुद्दा मांडतो, ''तर आता... कृपा वाढावी म्हणून आपण पापात राहावे काय?''[१२३] याचे उत्तर तो लगेच देतो आणि त्यात त्याचा क्रोध ही दिसून येतो, ''कधीच नाही! आपण पापाला मेलो ते आपण ह्यापुढे त्यात कसे राहणार?''[१२४]

कृपेने तारले जाण्याआधी मनुष्य पातकांचा दास होता पण आता तो नीतीमत्वाचा, न्याय्यतेचा सेवक आहे आणि या पावित्र्यपूर्ण दास्यात त्याने स्वतःला पूर्ण झोकून दिले पाहिजे. आपले पातक, दोष–अपराध आणि त्यातून आपण मुक्त होऊन उध्दारिले जावे याकरिता प्रभु ख्रिस्ताने स्वप्राण अर्पून भरलेली खंडणी यावर विचार केल्यास ख्रिस्ताच्या बलिदानाचे श्रेष्ठत्व पटून नेहमीकरिता पापत्याग करणे आपणांस निश्चित शक्य होईल.

जॉन बन्यन अतिशय कडक शब्दांमध्ये आपणांस इशारा देतातः ''आपण पातकांत राहणे म्हणजे एक प्रकारे देवाच्या न्यायाला आव्हान देणे, त्याच्या करूणेची जबरदस्तीने लूट करणे. त्याच्या सहनशीलतेची टवाळी करणे, त्याच्या सामर्थ्यास तुच्छ मानणे आणि त्याच्या प्रीतीचा तिटकारा करणे असे आहे.''

आपल्या प्रियजनांचा उध्दार होण्यासाठी प्रभुने स्वप्राणार्पणाची एवढी मोठी किंमत मोजली आहे तर मग या प्रियजनांनी मोहात पडण्याचा विचारहि करून प्रभुचा अवमान का करावा?

## योग्य आचरण कसे असावे?

''योग्य आचरण म्हणजे नेमके काय हे मला कसे कळेल?'' हा प्रश्न आपणांस पडणे स्वाभाविक आहे. या प्रश्नाचे उत्तर देवाने आपल्या

पवित्रशास्त्रात अगदी साध्या शब्दांत व्यवहार्य सुचनांसहित उपलब्ध करून दिले आहे. नवीन करारामध्ये अशा शेकडो आज्ञा आहेत पण येथे हे ही नमूद करणे गरजेचे आहे की या आज्ञा म्हणजे जगातील कायदेशीर हुकूमांसारख्या नव्हे ज्यांचे पालन न झाल्यास कडक दंड! तसे पाहायला गेले तर या अगदी न्याय्य सूचना आहेत ज्यामुळे ''कृपेव्दारे तारण लाभलेल्या विश्वासणाऱ्याचे आचरण–वर्तन कसे असावे?'' या प्रश्नाचे समर्पक उत्तर मिळते. पाहा, या एका शास्त्रपाठातच किती उदाहरणे मिळतात.[१२५]

''...लबाडी सोडून देऊन तुम्ही प्रत्येक जण आपआपल्या शेजाऱ्याबरोबर खरे बोला...''

''तुम्ही रागावा, परंतु पाप करू नका.''

''चोरी करणाऱ्याने पुन्हा चोरी करू नये. तर त्यापेक्षा गरजवंताला द्यावयास आपल्याजवळ काही असावे म्हणून जे चांगले ते आपल्या हातांनी करून उद्योग करीत राहावे.''

''तुमच्या मुखांतून कसलेच कुजके भाषण न निघो.''

''देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका.''

''सर्व प्रकारचे कडूपण, संताप, क्रोध, गलबला व निंदा ही अवघ्या दुष्टपणासह तुम्हांपासून दूर करण्यात येवोत.''

''आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हांस क्षमा केली आहे तशी तुम्हीहि एकमेकांना क्षमा करा.''

ज्या कृपेमुळे तारण लाभले तीच कृपा हेहि शिकवते की, ''आपण अभक्तीला व ऐहिक वासनांना नाकारून सांप्रतच्या युगात मर्यादेने, नीतिने व सुभक्तीने वागावे.''[१२६]

स्ट्रॉम्बेक अगदी स्पष्टपणे या मुद्द्याकडे आपले लक्ष वेधू इच्छितात. ''सद्यःच्या युगात ख्रिस्ती वर्तन–आचरणांमध्ये आढळणाऱ्या हीनतेचे मूळ कारण म्हणजे कृपेविषयी दिले जाणारे अर्धवट शिक्षण हे होय. परमेश्वराची

कृपा म्हणजे काय? हे जर आपण पुर्णतः समजून घेऊन त्याप्रमाणे या शिकवणुकीचा–शिक्षणाचा प्रसार केला तर स्वैराचारात दंग होण्यासाठी कृपेचा फाजील वापर होणार नाही, त्यासह कृपेविषयी असलेल्या अत्यंत चुकीच्या कल्पना व गैरसमजूती एकदाच्याच दुर होतील.''[१२७]

## प्रकरण १३

# ही अवघी कृपाच

अगदी सुरुवातीपासून तर शेवटापर्यन्त खिस्ती जीवन हे कृपायुक्त आहे. आपला कृपाधिपती परमेश्वर प्रभु यावर जो कोणी अंतःकरणापासून प्रीति करतो त्या विश्वासणाऱ्यावर परमपित्याच्या कृपेचा वर्षाव सतत होत राहतो. त्याची करूणा आपल्या दृष्टिआड झाली तरी त्याची दया आपल्यावर निरंतर आहे हे आपल्या लक्षात येते.

या पृथ्वीतलावर आपल्या जीवितास असणारे निरनिराळे धोके जसे जीवघेणे आजार, विषाणू, अपघाताच्या अमर्याद शक्यता, प्रवासामधील जोखीम, आसपासचे हिंसक वातावरण हे सर्व पाहता यापासून आपण राखले जाऊन आपला बचाव होणे ही केवळ देवाची कृपाच आहे. विश्वासणाऱ्यांकरिता हा चमत्कार केवळ या स्वर्गीय कृपेमुळेच सिध्द होतो.

आपणांस ईश्वरी मार्गदर्शन हवे असते तेव्हा परमेश्वराच्या कृपेचा विचार करा. आपल्यासारखेच अनेकजण त्याच्यावर साहाय्य-मार्गदर्शनाकरिता अवलंबून असतात आणि तो त्या प्रत्येकांस काळजीपूर्वक ते पुरवितो.

'न्याय व करूणेने तो माझा समय योजितो
जे इष्ट नि माझ्या हिताचे गुंफून माझ्या प्रभुने केले हे सर्व मानव स्तवितो.'

अनेकदा जीवनाचा मार्ग अंतहीन वाळवंटासारखा वा पदोपदी जीवघेणे सुरुंग पेरलेल्या युध्दभूमीसारखा भासतो पण आयुष्यातील प्रत्येक क्षणी आपला प्रभु ज्याने आपल्याला त्याच्या रक्ताची खंडणी भरून त्याच्याकरिता घेतले आहे. अत्यंत प्रीतीपूर्ण रितीने सदैव आपली काळजी वाहतो.

आणि कधीही रिते न होणाऱ्या स्वर्गीय भांडारातून परमश्रेष्ठ दाता आपल्या प्रियजनांना लागणाऱ्या सर्वच गोष्टींचा प्रभु ख्रिस्ताच्या कृपेव्दारे पुरवठा करतो. परमेश्वर आपल्या विश्वासू, प्रियजनांना 'गव्हाचे सत्व खाऊ घालतो आणि पहाडातल्या मधाने त्यांना तृप्त करितो.'[१२८]

परमेश्वर सर्वज्ञानी आहे. कोणताही क्षण अथवा घटना त्याच्या नियंत्रणाबाहेर नाही. त्याची कृपादृष्टि लाभलेल्यांस साहाय्य पुरविण्यासाठी तो सदासिद्ध असतो. या विश्वासणाऱ्यांच्या आयुष्यात परमेश्वर अघटित असे काही घडू देत नाही उलट त्यांच्या करिता तो केवळ हिताच्या योजना आखून त्यांचे भलेच करतो. परमेश्वरावर नितांत प्रिति करणाऱ्यांसाठीचे अभिवचन पाहा. ''तुझ्यावर चालविण्याकरिता घडिलेले कोणतेही हत्यार तुजवर चालणार नाही, तुजवर आरोप ठेवणाऱ्या सर्व जिव्हांना तू दोषी ठरविशील.''[१२९] परमेश्वर आपल्या गौरवात विश्वासणाऱ्यांची सर्वदा काळजी वाहून त्यांचे हित जपतो व त्यांच्याविरुध्दच्या दुष्टांच्या सर्व योजना बळाने घालवतो.

परमेश्वराची कृपा, करूणा जशी अपरिमीत आहे तशीच त्याची क्षमाशीलताही अपरिमीत आहे. दाविदराजाचीच गोष्ट पाहा ना. उरिया हित्ती जेव्हा युध्दावर होता तेव्हा त्याने त्याच्या बायको–बथशेबेशी व्यभिचार केला. परिणामस्वरुप बथशेबेस जेव्हा दाविदाचा गर्भ राहिला तेव्हा त्याने उरियास माघारी बोलावले व व्यभिचारातून राहिलेल्या गर्भाचे पितृत्व उरियावर लादण्याकरिता अनेक खटाटोप केला. पण जेव्हा हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले तेव्हा अभिषिक्त राजाला न शोभेल अशा खालच्या पातळीस जाऊन व्यूह रचला आणि उरियास पुन्हा युध्दस्थानी पाठवून शत्रूंच्या हाती त्याचा वध करविला. या अनीतिपूर्ण नीच विश्वासघातकी कृत्याचा नंतर दाविदाला अतीव पश्चात्ताप झाला व तो परमेश्वरास शरण गेला तेव्हा त्याच्या कानी बंधमुक्ततेचे शब्द पडले, ''परमेश्वराने तुझे पातक दूर केले

आहे.'' या अलौकिक क्षमाशीलतेचे वर्णन करताना सॅम्युएल डेव्हिस म्हणतातः

*हे अद्‌भुत परमेश्वरा*
*तुझे मार्ग तुझे विस्मयकारी गुण दर्शवितात*
*पण केवळ तुझी कृपा अधिक गौरवशाली आहे,*
*तुजसारखा क्षमाशील परमेश्वर कोणी नाही, तुजइतकी असीम परिमीत कृपा कोणाकडे नाही.*
*केवळ तुच सर्व पातके, दोष, अधमपणांची क्षमा करू शकतो.*
*या विशेषाधिकाराचा बहुमान इतर कोणाकडे नाही,*
*कारण तुजसारखा थोर उदात्त कोणीही नाही,*
*तुजसारखा क्षमाशील परमेश्वर कोणी नाही,*
*तुजइतकी असीमअपरिमीत कृपा कोणाकडे नाही,*

परमेश्वर आपल्या प्रियजनांची गरज जाणून त्यांना सातत्याने कृपेचा पुरवठा करित असतो. म्हणूनच गुंतागुंतीच्या अवघड शस्त्रक्रियेलाहि ख्रिस्ती मनुष्य विश्वासाने अत्यंत धीराने सामोरा जातो. ख्रिस्ती विश्वासणारे कोणत्याही आजारात असता केवळ प्रभुच्या सामर्थ्यामुळे बलशाली होतात. या पृथ्वीतलावरिल कार्य पूर्ण केलेल्या शेवटच्या घटकेत असणाऱ्या प्रियजनांसही परमेश्वर त्याची कृपायुक्त शांती प्रदान करितो.

आपल्या स्वर्गीय वैभवाचा त्याग करून प्रभू लीन व दीन झाला जेणेकरून पातकांमुळे अयोग्य असलेल्या मानवास कल्पनेपलीकडे असलेली तारणाची देणगी लाभावी यापेक्षा कृपेचे मोठे उदाहरण काय असू शकते?

''हे बापा, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करितात हे त्यांना समजत नाही.''[१३०] कलवरी किंवा कवटी म्हटलेल्या ठिकाणाहून केलेल्या या प्रार्थनेत प्रभुची वर्णनातीत, कोणत्याही शब्दांत न सामावली जाणारी कृपाच दिसून येते.

जेथे काही काळापूर्वीच देहधारी एकमेवाव्दित्तीय पुत्राचा मृत्यु झाला

होता तेथे आपल्या स्वर्गीय कृपेमुळेच परमेश्वर आपला पवित्र आत्मा पुन्हा पाठवतो हे किती महान वात्सल्य आहे.

परमेश्वराची कृपा खरोखरी अव्दित्तीय आहे म्हणूनच या सर्वश्रेष्ठ कृपेचे वर्णन करताना स्तोत्रकर्ता म्हणतो, देवा तुझे मोलवान संकल्प वाळूच्या कणांपेक्षा अधिक आहेत.[१३१] व ते गगनाला जाऊन भिडले आहेत.[१३२] विश्वासणाऱ्या प्रियजनांवर त्याची कृपा पाहा की आमच्या पातकांच्या मानाने आम्हांला त्याने शासन केले नाही, त्याने आमच्या दुष्कृत्यांच्या मानाने आम्हांस प्रतिफळ दिले नाही.[१३३] परमेश्वराची दया व करूणा अखंड आहे. ती रोज सकाळी नवी होते.[१३४]

निसर्गनियमानुसार असलेल्या जीवनापासून आध्यात्मिक जीवनापर्यन्त व पुढेही अनंतकालिक जीवनापर्यन्त आपल्यावर परमेश्वराची अमर्याद असीम कृपा आहे. आणि ही अवघी कृपाच स्तुति आराधनेचा सर्वदा विषय असेल.

## प्रकरण १४

# कृपेची उजळणी

आपल्या थोर परमेश्वराच्या असीम कृपेची उदात्तता समजून घेत असता आपण यातील महत्त्वाच्या मुद्द्यांचे पुन्हा अवलोकन करू या.

ज्या प्रश्नाकडे आपण प्रथम वळणार आहोत तो हा आहे. देव जो परमपवित्र आणि नीतिमान आहे, तारण योजित असताना तो पातक्यांना क्षमा करूनही न्याय्य कसा राहू शकतो?

या प्रश्नाचे उत्तर 'रदबदली' या एका शब्दात सामावले आहे. परमेश्वराने त्याचा एकमात्र पुत्र प्रभु येशू ख्रिस्त ह्यांस सर्व मानव जातीच्या पातकांकरिता कालवरीच्या वधस्तंभावर अर्पण म्हणून पाठविले. तेथे त्याने मानवाच्या उध्दाराकरिता प्राण अर्पूण आपल्या रक्ताची खंडणी भरली. 'अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.'

आमच्यापैकी कोणीही या देणगीस, या सवलतीस पात्र नसताना देवाने आपल्यावर एवढी प्रीति करावी ही त्याची निर्मळ, निर्व्याज कृपाच आहे. या अनमोल कृपादानाचे महत्त्व जाणून घेताना आपण प्रभु येशू ख्रिस्त व त्याचे महान बलिदान समजून घेणे गरजेचे आहे. ज्यांच्यासाठी हे महान कार्य त्याने केले ते त्याचा विश्वासाने अंगिकार करून आशिर्वादीत होतात हे सत्य पण लक्षात घेतले पाहिजे.

या जगात आणखी फक्त एकच धर्म आहे. आणि त्यास निराळे वर्तमान असे म्हणतात पण त्यात शुभ वा चांगले असे काहीच नाही. आपण आपल्या चांगुलपणामुळे किंवा आपण संपादन केलेल्या गोष्टींमुळे स्वर्ग

मिळवू शकतो असे शिक्षण ते देते. लोकांच्या गर्वाला सुखाची फुंकर घालणारा हा धर्म यामुळेच लोकप्रिय व सर्वतोमुखी आहे. याचे दावे मोठे असले तरी हा ना तारणाची हमी देतो ना कोणत्या सुरक्षेची... सार्वकालिक जीवनाची तर मुळीच नाही. याचा अंत अधःपतनातून शेवटी नरकातच होतो.

जे कृपेमुळे तारण पावतात ते सर्व श्रेय व सन्मान प्रभु ख्रिस्ताला देतात. तथाकथित पुण्यकार्य वा सत्कर्मांव्दारे तारण मिळवता येते या भ्रमात जे असतात त्यांना मनुष्य कोणत्या आधारे स्वर्गप्राप्तीची आशा करीत आहे हे आपण सांगू शकता.

सत्कर्मांमुळे तारण लाभत नाही असे जेव्हा आम्ही सांगतो याचा अर्थ हा घेऊ नये की आम्ही सत्कर्मांच्या विरोधात आहो. आम्ही आपणांस हे सांगू इच्छितो की सत्कर्म ही तारणाची मुळे नव्हे तर फळे आहेत. आपण सत्कर्मे केल्यामुळे नाही तर सत्कर्म करण्यासाठी तारले गेलो आहोत. म्हणूनच सत्कर्म तारण साध्य करण्यासाठीचे कारण नव्हे तर तारणानंतरचा परिणाम आहे, उगम नव्हे तर निष्पत्ति आहे.

''तारणप्राप्तीनंतर एखाद्याकडून पातक घडले तर तो तारणाला मुकतो का?'' हा प्रश्न उद्‌भवणे स्वाभाविक आहे. कृपेचे सत्य स्वरुप व शास्त्राचा सुसंगत आधार समजून घेता या प्रश्नाचे उत्तर ''नाही'' म्हणूनच येते. तो तारणाला मुकत नाही. पातकामुळे सहभागिता संपुष्टात येते, नाते नव्हे. सहभागिता एका नाजूक रेशीमधाग्यासारखी आहे तर नाते हे मजबुत साखळदंडासारखे आहे. विश्वासणाऱ्याने अंतःकरणपूर्वक पापकबुली दिली व पश्चाताप केला तर देव त्याला क्षमा करून पुन्हा सहभागिता देऊ शकतो.

स्वतःला ख्रिस्ती म्हणवून घेणाऱ्या प्रत्येकास तारण लाभले आहे असेही नाही. जर एखाद्याच्या जीवनात पातकाचेच वर्चस्व असेल आणि जर तो किंवा ती पापांतच जगत असेल तर त्याचे स्वतःला ख्रिस्ती

म्हणवून घेणे अयोग्य आहे. तो मग केवळ धर्माचा बाणा मिरवणारा होतो. एखादा जेव्हा जीवनात ख्रिस्ताला स्थान देतो जेव्हा इतारांनाही त्याच्यात ख्रिस्त स्पष्टपणे दिसून येतो.

ज्यांना वाटते की कृपेची सुवार्ता अल्पमोलाची किरकोळ आहे त्यांना ही समज देणे पुरेशी आहे की देणगीचे मोल 'दात्याने' आधीच चुकते केले आहे. आपल्याला सार्वकालिक जीवनाची देणगी लाभावी म्हणून परमेश्वराने फार मोठी किंमत मोजली आहे.

इतर उत्तम गोष्टींप्रमाणेच कृपेचाही दुरुपयोग होऊ शकतो. स्वैराचार करताना, पातकांमध्ये रममाण होताना लोक कृपेचा गैरवापर करतात. पण यात दोष कृपेच्या तत्वांचा नव्हे तर त्या व्यक्तिचा असतो.

नियमशास्त्र नव्हे तर कृपा हेच पावित्र्यपूर्ण जीवनाकरिता, उत्तम ख्रिस्ती वर्तनाकरिता प्रेरणादायी आहे. नियमशास्त्र केवळ कर्तव्य पालनाविषयी सांगते, त्यात कसूर झाल्यास दंडाज्ञा आहेच. पण कृपा आपल्याला प्रभु ख्रिस्ताने केलेल्या महत्कृत्याविषयी व त्यास अनुसरुन ख्रिस्तास साजेसे जीवन जगण्याकरिता विनवते व त्यासाठी अनुग्रह करते.

देवाच्या लेकरांचे आयुष्य सुरुवातीपासून तर शेवटपर्यन्त अवघ्या कृपेने युक्त असते. देवाची किती आश्चर्यकारक कृपा आहे की तो आपला ऋणी नसताही आपल्यावर सतत त्याच्या आशिर्वादांचा वर्षाव आपल्यावर करतो. दंडाज्ञेच्या पात्र असलेल्या आम्हांस सदैव उत्तम गोष्टी पुरविणाऱ्या परमेश्वराची ही सत्यकथा आहे.

ज्यांना त्याच्या अद्भुत कृपेचा लाभ घेता येईल अशा स्त्री–पुरुषांचा परमेश्वर अजूनहि शोध घेत आहे. शतकानुशकते मानवांनी केलेली कठीण मने, त्यांची उदासीनता, अव्हेर यामुळे विन्मुख न होता कृपाळू परमेश्वर आजही शुभवर्तमानाचा प्रसार व प्रचार घडवून आणत आहे. तो आशांचा शोध घेतोय जे आपले दोष–अपराध कबूल करतील, जे भरकटून इतर मार्गांनी 'मोक्ष' मिळण्याचा निष्फळ प्रयत्न करत आहे. अशा आत्म्यांनी

प्रभु येशू ख्रिस्ताला उध्दारकर्ता म्हणून स्वीकारावे व तारणाची कृपा मिळवावी असे देवाला वाटते. किती सहज सोपे आहे हे!

आणि हे लक्षात असू द्या! प्रभु येशू ख्रिस्ताविषयी कोणाही व्यक्तिमध्ये कणभर जरी विश्वास आढळला तरी परमेश्वर त्या व्यक्तिची नीतिमानांमध्ये गणना करितो. एच.ए.आयनसाईड म्हणतात, ''देवाला मानवांविषयी इतकी कणव वाटते की प्रभु ख्रिस्तास तारणारा म्हणून जाणणाऱ्यालाहि तो त्याच्या विश्वासाच्या लहानश्या कृतीमुळे स्वर्गात प्रवेश देईल. काय अव्दित्तीय कृपा ही!''[१३५] थोडक्यात एखाद्याने प्रभु ख्रिस्ताचे कार्य जाणून त्यास उध्दारक म्हणून स्वीकारण्याचा विश्वास दाखवला तरी परमेश्वर आपल्या अपार कृपेने त्यास जवळ घेईल.

शेवटचे प्रकरण अजून लिहिले गेले नाही. ह्यासाठी की, ख्रिस्त येशूच्या ठायी त्याच्या तुम्हांआम्हावरिल ममतेच्याव्दारे येणाऱ्या युगात त्याने आपल्या कृपेची अपार समृध्दि दाखवावी.[१३६] तारणाच्या अद्‌भुत योजनेचा त्याने अशाप्रकारे उलगडा केला की पापाच्या घनदाट जंगलात हरवलेल्यांचा शोध घेऊन त्यांचा उध्दार करण्यासाठी त्याने आपला अनन्यसाधारण पुत्र पाठवला. आणि या देवपुत्राच्या कालवरी येथील महान बलिदानमुळे तुम्हांआम्हांस गौरवी आशिर्वाद लाभले.

पवित्रशास्त्र या अलौकिक स्वर्गीय ग्रंथाची समाप्ती ज्या कृपावचनाने होते त्याच वचनाचा आधार घेऊन आम्हीही प्रार्थितो – ''प्रभु येशूची कृपा सर्व जनांबरोबर असो. आमेन.''

## माझे आश्रयस्थान

*सर्वोच्च श्रेष्ठ प्रीति, अपार कल्याणकारी*
*योजूनी तारण सकलांचे. पातक्यांस उध्दरी!*
*अद्वित्तीय अनमोल कृपा कल्याणकारी*
*घेऊनी कवेत मज पातक्यास तारी.*

*हात ऊंचावूनी भांडलो मी विश्वनिर्मात्याशी,*
*अव्हेरुनी त्याची कृपा गर्वाने दिले आश्रयस्थान झुगारुनी.*

*प्रकाशाहूनी प्रिय मजला निबिड अंधकार,*
*लपूनी त्यात, विना आश्रयस्थाना धावलो फार.*

*सार्वकालिक न्यायाने दिले आदेश सर्वशक्तिमान प्रीतिला,*
*आणावे जखडूनी प्रीतीबंधनात या क्षुद्र मानवाला.*
*दुर्दशा विपत्तीच्या बाणांनी घायाळ हे जरी आले माझ्या ध्यानी*
*पण नाही मिळवू शकलो मी आश्रय कोणत्याहि स्थानी.*

*लपण्यासाठी क्रुध्द न्यायापासून धाव घेतली*
*जाज्वल्य सीनाय पर्वती,*
*हे ते आश्रयस्थानच नव्हे, मजला क्रोधित न्यायाधिश सांगाति.*

*स्वर्गीची वाणी होऊनि करुणेचा दूत मजपुढे अवतरुनी*
*हर्षाने नेले मजला प्रभु येशूकडे माझ्या खऱ्या आश्रय स्थानी.*

*परात्पर पित्याच्या रोषापासून मानवा राखाया*
*अनंतकाळच्या यातनांतून सोडवी आम्हां प्रभुराया*
*जनउध्दाराकरिता अर्पूनी स्वप्राण–*
*ख्रिस्ताने दिधले तारण होऊनी आश्रयस्थान.*

*कोसळूनी वीजा जरी पावली कंप ही धरणी*
*सुरक्षित मी येशू सवे, ख्रिस्त माझ्या आश्रयस्थानी*

*सुर्यास्तानंतर पुढे पोंहचेन मी माझ्या कनानी*
*गाईन कृपागायने पाहिन येशू ख्रिस्ता आश्रयस्थानी*

सप्टेंबर २३, १७८० रोजी मेजर जॉन आंद्रे जेव्हा युध्दात पकडले गेले तेव्हा ही कवणे त्यांच्याकडे आढळली होती. ही त्यांनीच लिहिली होती का याविषयी काही माहिती उपलब्ध नाही.

# स्पष्टीकरणार्थ अंतिम टीपा

# स्पष्टीकरणार्थ अंतिम टीपा

**पाठ २**

१. १ तीमथ्य. २:५

२. योहान १:१

३. २ करिंथ .५:२१, १ पेत्र २:२२, १ योहान ३:५

४. १ योहान १:७

५. स्तोत्र. ४०:८, इब्री १२:२

६. यशया ५३:४–६

७. योहान १:२९

८. गलती. २:२०

९. १ पेत्र २:२४

१०. १ योहान २:२

११. योहान ३:१६

१२. १ योहान २:२

१३. रोम. ३:२३

१४. मत्तय ११:२८

१५. प्रकटीकरण २२:१७

१६. चक स्थिथ, हीज वर्कमनशिप, सर्व्हंटस् ऑफ द किंग. ब्रूमली, केन्ट, इंग्लंड : एस टी एल बुक्स १९८९, पृष्ठ क्रं. १३९–४०

१७. योहान ३:३६

१८. स्तोत्र. ८५:१०

१९. द ॲप्लॉज ऑफ हेवन, डलास; वर्ड पब्लिशिंग,१९९०,पृष्ठ १७५–१७६

२०. जॉन.एफ.मॅकआर्थर, ज्युनिअर, फेथ वर्क्स, डलास : वर्ड पब्लिशिंग, १९९३, पृष्ठ ९९

२१. बॅप्टिस्ट बिब्लीकल हेरिटेज, एप्रिल १९९४, पृष्ठ १

## पाठ ३

२२. इब्री. ४:१०

२३. योहान १:१२; ३:१५–१६; ३:३६; ५:२४; ६:४०,४७; ७:३७–३८; ११:२५–२६; २०:३१; प्रेषितांची कृत्ये १६:३१, रोम. १०:९, गलती ३:२२–२६, इफिस. २:८, १ योहान ५:१०–१३

## पाठ ४

२४. इफिस. २:८–९

२५. स्तोत्र. ४०:१–३

२६. सरप्राईज्ड बाय जॉय (न्यु यॉर्क : हरकोर्ट ब्रेस जोवानोविच पब्लिशर्स, १९८४) पृष्ठ २२९

२७. मत्तय २०:१६

२८. १ थेस्सलनी ४:१. कृपेविषयी व कृपेसंदर्भात विचार खालील प्रकार ही मांडण्यात आले आहेत ''मी तुम्हांस विनवतो'' (रोम. १२:१) आणि ''.... न व्हावे'' (रोम. ६:१२)

## पाठ ५

२९. यशया ४०:१२

३०. बॅप्टिस्ट बिब्लीकल हेरिटेज, एप्रिल १९९४, पृष्ठ १
३१. यिमर्या १७:९
३२. रोम. ३:२३
३३. इफिस. २:२–३, १२
३४. आवर डेली ब्रेड, एप्रिल २०, १९९४
३५. पावर ऑफ स्टोरी, लेटन फोर्ड, कोलोराडो स्प्रिंग्स, नाव्हप्रेस १९९४, पृष्ठ ११२
३६. द हार्ट ऑफ द गॉस्पल, व्हिटन, इल; क्रॉसवे, १९९१, १६५–६६.
३७. रोम. ६:२३
३८. योहान १०:१०
३९. कलस्सै. १:२७
४०. इफिस. १:७
४१. कलस्सै. २:१४
४२. १ पेत्र १:१८
४३. इफिस. २:५
४४. इफिस. १:६
४५. कलस्सै. २:१०
४६. योहान १७:२३
४७. रोम. ५:१
४८. इब्री. १०:१०
४९. इब्री. ४:१४–१६; रोम. ८:३४; १ योहान २:१; योहान १४:१६
५०. योहान १४:१६–१७
५१. १ करिंथ १२:१३
५२. इफिस. १:१३
५३. इफिस. १:१४

५४. १ योहान २:२७

५५. इफिस. २:१८

५६. इब्री. १०:१९

५७. फिलिप्पै. ३:२०

५८. योहान १:१२

५९. गलती. ४:६

६०. रोम ८:१७

६१. १ पेत्र २:५,९

६२. रोम ८:३७

६३. १ योहान ३:२

६४. इफिस. १:३

६५. सी.एच. स्पर्जियन, सर्मन्स् ऑन द बुक ऑफ डॅनियल, ग्रॅण्ड रॅपिडस्, झोन्डरवॅन पब्लिशिंग हाऊस, १९६६, पृष्ठ ५४

६६. पर्सुएशन, लंडन : मॅक डोनाल्ड ॲण्ड जेन्स, १९७४, पृ. २७३.

६७. रोम. ५:२० ब.

## पाठ ६

६८. नीतिसूत्रे १४:१२

६९. रोम. ११:६

७०. लूक १८:१८

७१. रोम ३:२०, २८, ४:५; गलती. २:१६, ३:१०–११, इफिस. २:९, २ तीमथ्य. १:९; तीता ३:५

७२. रोम. ३:२०, २८, ४:१–१२, गलती. २:१६,३:१०–१४, इफिस. २:८–९, २ तीमथ्य १:९;तीता. ३:५

७३. रोम. ४:१६

७४. गलती. ४:२८–३१

## पाठ ७

७५. रूथ २:१०

७६. २ शमुवेल ७:१८

७७. २ शमुवेल ९:८

७८. इफिस ३:८–९

७९. फ्रॉम व्हिक्टोरियस ख्रिश्चन्स्, यु शुड नो, वॉरेन डब्ल्यू वीरस्बी (ग्रॅण्ड रेपिडस् : बेकर बुक हाऊस, १९९८) पृष्ठ ६३–६४.

८०. अर्मिनियन्स हा पंथ / गट तारणात माणसाच्या इच्छास्वातंत्र्यावर जोर देतो तर कॅल्व्हिनीस्ट देवाचे सार्वभौमत्व, अधिपत्य व निवड यावर जोर देणारे आहेत. हे संभाषण हेच दर्शविते की दोन्ही मते एकमेकांकरिता विशेष अगत्याची नाहीत.

## पाठ ८

८१. द बायबल एक्सपोझिशन कमेन्ट्री, व्हॉल्यूम (खंड २), व्हीटन आय. एल., व्हिक्टर बुक्स, १९८९, पृष्ठ ८४

८२. यहूदाचे पत्र २४

## पाठ ९

८३. योहान ६:२९

८४. यशया ६४:६

८५. योहान १२:२६, १ करिंथ. ३:८, इफिस. २:१०, ६:८,तीता. ३:८, इब्री. ६:१०, प्रकटीकरण २२:१२

## पाठ १०

८६. योहान १०:२७–२८

८७. रोम. ११:२९

८८. १ पेत्र. १:५; यहूदा १ क, २४
८९. रोम. ६:२३
९०. योहान १:१२
९१. रोम. ८:३०
९२. योहान १४:१६
९३. २ करिंथ. १:२२, ५:५, इफिस. १:१४
९४. २ करिंथ १:२२, इफिस. १:१३, ४:३०
९५. रोम. ५:१०
९६. योहान ५:२४
९७. १ करिंथ. १५:३
९८. योहान १९:३०
९९. रोम. ८:३८–३९
१००. १ योहान १:६
१०१. १ योहान २:१ ब
१०२. १ योहान १:७
१०३. स्तोत्र ५१:१२
१०४. स्तोत्र ३२:४
१०५. उत्पत्ति १९:१४ ब
१०६. २ शमुवेल १२:१४
१०७. २ तीमथ्य. २:१९ ब
१०८. स्तोत्र. ६६:१८
१०९. १ करिंथ. ३:१५
११०. १ करिंथ. ११:३० अ
१११. १ करिंथ. ९:२७
११२. १ करिंथ. ११:३० ब

११३. १ करिंथ. ३:१५ ब
११४. नीति. २८:१३

## पाठ ११

११५. रोम. ६:१४
११६. १ करिंथ. ९:२१
११७. योहान ८:३६
११८. गलती. ५:१३
११९. जॉन एफ. मॅकआर्थर, ज्युनिअर, फेथ वर्क्स, डलास :वर्ड पब्लिशिंग १९९३, पृष्ठ १२०
१२०. यहूदा ४

## पाठ १२

१२१. गलती. ३:३
१२२. जे.एफ. स्ट्रॉम्बेक, डिसीप्लिन्ड बाय ग्रेस, ग्रेस ॲण्ड ट्रुथ, मोलिन इल : १९४६, पृष्ठ १०२
१२३. रोम. ६:१
१२४. रोम. ६:२
१२५. इफिस. ४:२५–३२
१२६. तीता. २:१२
१२७. जे.एफ. स्ट्रॉम्बेक, डिसीप्लिन्ड बाय ग्रेस, पृष्ठ २०

## पाठ १३

१२८. स्तोत्र. ८१:१६
१२९. यशया ५४:१७
१३०. लूक २३:३४

१३१. स्तोत्र १३९:१७–१८

१३२. स्तोत्र ३६:५

१३३. स्तोत्र १०३:१०

१३४. विलापगीत ३:२२–२३

## पाठ १४

१३५. १. एच.ए. आयर्नसाईड, द लेवीटिकल ऑफरिंग्स्, नेप्चून, एन.जेः लोईझेक्स ब्रदर्स. १९८२, पृष्ठ ६४

१३६. इफिस. २:७